


आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

सोमवार, २२ जानेवारी २०२४


# अयोध्येतील राम मंदिरासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जन्म

## भारतवर्षासाठी अतीव भाग्याचा क्षण

आधुनिक केसरी न्यूज

श्रीराम, श्रीराम, श्रीराम, श्रीराम, श्रीराम
श्री रामचंद्र कृपालु भज मन, हरण भवभय दारुणं।
नवकंज लोचन कंजमुखकर कंजपद कंजारुणम।

**धर्मयुगात कंसाचा वध करण्यासाठी श्रीकृष्णाचा जन्म, रामायणकाळात रावणाचा वध करण्यासाठी प्रभु रामचंद्राचा जन्म, दुर्योधनाचा वध करण्यासाठी अर्जुनाचा जन्म, हिरण्यकश्यपुला मारण्यासाठी नृसिंह अवतार. त्याचप्रमाणे अयोध्येत राम मंदिर बांधण्यासाठी साडेचारशे वर्षांनंतर पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींचा जन्म, असं म्हटलं तर अतिशयोक्ती होणार नाही.**

आज 22 जानेवारीला अयोध्येत प्रभू रामचंद्र मूर्तीची प्रतिष्ठापना दिमाखदार सोहळ्याने होत असून ज्याची तयारी देशाच्या कानाकोपऱ्यात हिंदू बांधव करताना दिसतात. प्रभू रामचंद्र जन्मालाच आले नाहीत इथपासून केवळ मताच्या लाचारीसाठी ज्या काँग्रेसवाल्यांनी उभ्या आयुष्यात भाजपला शिव्या देताना कलियुगात देखील रामाला वनवासात ठेवले. तीच मंडळी आज श्रेय घेण्यासाठी धडपड करू लागली हे आश्चर्यच म्हणावे. मणिशंकर अय्यरपासून दिग्विजयसिंह यांना तर अयोध्येत पाय ठेवण्याचा मुळात नैतिक अधिकारच नाही. ज्यांनी नेहमीच त्या स्थळासह राम नावाची अवहेलनाच केली. मंदिर काम का नही, शौचालय बाँधेंगे, अशा घोषणा देखील काँग्रेसवाल्यांनी दिलेल्या लोक विसरले नाहीत. ऊन, पाऊस, वारा अगदी तंबूत ठेवण्याचे पाप यामागे काँग्रेसवाले कमी नाहीत. पण न्यायदेवतेनं अखेर निवाडा दिला. प्रभू रामाचं अस्तित्व मान्य केलं आणि हा सारा उद्योग घडवून आणण्यासाठी पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांना जन्म घ्यावा लागला. प्रश्न नेहमीच पडतो की समजा मोदी हे पंतप्रधान नसते तर? राम जन्मभूमीचा प्रश्न मार्गी लागला असता का?

आज देशातील समस्त भारतीयांच्या स्वाभिमानाचा, अस्मितेचा दिवस म्हणावा लागेल. कारण 22 रोजी अयोध्येत प्रभू रामचंद्राची भव्य मूर्ती विधिवत प्राणप्रतिष्ठा होणार. हे मंदिर भारताचे वैभव, श्रद्धा आणि अस्मितेचं अजरामर प्रतीक आहे हे लक्षात घ्यावे लागणार. जो क्षण पाहण्यासाठी देशातील कोट्यवधी हिंदू आतुर आहेत त्यांच्या सामूहिक लढ्याच्या प्रयत्नाचे हे यशच म्हणावे लागेल. मुघलांनी भारतीय हिंदू समाजातील अस्मिता, श्रद्धा पुसून टाकण्यासाठी खऱ्या अर्थाने अयोध्येतील राम मंदिर पाडून त्या ठिकाणी बाबरी बांधली होती. ज्याचा लढा साडेचारशे वर्षे अधिक काळ चालला. खरं तर राम कुणाचा? हा प्रश्न अनेक जण जेव्हा विचारतात तेव्हा जगाच्या पाठीवर चराचर जीवांसाठी प्रभू रामचंद्र हा बाप म्हणून ओळखला जातो. अयोध्येतील मंदिर कुणी पाडले? बाबरी कुणी बांधली? या खोलात जाण्यापेक्षा जे स्वप्न भारतीयांचं होतं, ज्याच्यासाठी साडेचारशे वर्षे लढा भारतीय जीवांनी दिला तो क्षण समीप आल्याने संपूर्ण देशात आज 22 जानेवारीला दिवाळी साजरी होणार यात शंका नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे नेतृत्व वर्षानुवर्षे काँग्रेसवाल्यांनी केलं. खरं तर असा एक दिवस ज्या देशात फक्त काँग्रेस हाच ओळखीचा पक्ष म्हणून उदयास आला होता. कालांतराने डावे, उजवे नंतर संघ, जनसंघ आणि पुन्हा भारतीय जनता पार्टी. पण रामाच्या नावाने राजकारणच नव्हतं. फक्त मंदिर उद्ध्वस्त करून बाबरी बांधली ते भारतीयांना खटकलं होतं. ज्या अयोध्येत प्रभू रामचंद्र जन्माला आले तिथे राम मंदिरच असावे यासाठी समस्त हिंदू धर्माने वेगवेगळ्या मार्गाने सामूहिक लढा दिला. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, कालांतराने संघ परिवार नंतर भाजप असे हिंदू राष्ट्र भक्तीच्या प्रवाहातले वेगवेगळे आयाम लढ्याचे साक्षीदार म्हणावे लागतील. मागणी योग्य होती. कारण प्रभू रामचंद्र अयोध्येतच जन्माला आले होते. ज्याचे पुरावे मोठ्या प्रमाणावर मिळाले. न्यायदेवतेला देखील पटले. मात्र या देशात जी व्यवस्था होती उदा. काँग्रेसवाले सत्तेवर होते, त्यांनीच हा मंदिर बांधकामाचा प्रश्न केवळ मतांच्या लाचारीसाठी लोंबकळत ठेवला असं म्हटलं तर चुकीचं वाटणार नाही. अयोध्येत होणारे शिलान्यास कार्यक्रम असोत किंवा कारसेवकांची मोहीम असो या साऱ्या चळवळीला हाणून पाडण्याचे काम अनेकदा काँग्रेसवाल्यांनी केंद्रात आणि राज्यात सुरू केलं. समाजवादी पुन्हा डावे आणि काँग्रेसवाले या सगळ्यांचं एकत्रित पाप म्हणजे राम मंदिर न होऊ देणं असंच म्हणावे लागेल. पण हिंदू किती सहिष्णु आहेत! एक दिवस अहिंसेच्या मार्गाने न्याय मिळू शकतो या आशेने ज्या लढ्याला साडेचारशे वर्षे झाली तेव्हा पदरात यश पडलं. नेहमीच काँग्रेसवाल्यांनी राम मंदिर बांधकाम मोहिमेची अवहेलना केलेली आहे. फार जुन्या काळातले नाही तरीही इंदिरा गांधी, राजीव गांधी तदनंतर सत्तेवर असलेल्या काँग्रेसी पंतप्रधानाने मंदिर बांधकामाचा विषय हाताळताना केवळ हिंदू धर्माची अवहेलनाच केली असं नव्हे राम जन्मालाच आले नव्हते यावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. म्हणूनच राम मंदिर ट्रस्ट अयोध्या आणि सरकार यांच्यातील संघर्ष अनेक वर्षे सुरू राहिला. कदाचित काँग्रेसी व्यवस्थेने राम मंदिराचा प्रश्न चुटकीसरशी मार्गी लावला असता तर आमचा राम कलियुगात वनवासात गेलाच नसता हे मात्र नक्की. फार जुन्या




काळात आम्ही जात नाहीत पण काँग्रेसवाले राम मंदिराच्या प्रश्नावर काय बोलायचे? हे आपण बघू. जानेवारी 2021 मध्ये दिग्विजय सिंह काँग्रेस नेता यांनी जाहीरपणे असं म्हटलं होतं की, राम मंदिर न्यास हिंदु-मुस्लिम समाजात भेदभाव निर्माण करत आहे. काँग्रेस नेता मणिशंकर अय्यरनी रामाचा जन्म कधी आणि कुठे झाला? यावर प्रश्न उपस्थित केला होता. कहाँ पैदा हुए राम? असं ते म्हणाले. एक पवन बन्सल नावाचा काँग्रेस नेता राम मंदिर देणगी मागण्यासाठी आलेल्या लोकांना झिडकारून टाकताना हम नही देंगे चंदा असं त्यांनी म्हटलं होतं. 2021 मध्ये काँग्रेस सेवा दल राजाराम यांनी तर नीचपणाचा कळस गाठताना मंदिराच्या जागेवर ---- नही करेंगे अशी गरळ ओकत औकात दाखवून दिली होती. अनेक काँग्रेसवाल्यांनी तर राम मंदिराच्या नावाखाली पैसा उकळून दारू पितात असंही म्हटलं होतं. भरतसिंह सोळंकी यांनी देखील राम शिला पूजनावर कुत्रे लघुशंका करतात असं म्हणत हेटाळणी केली होती. सांगायचं तात्पर्य असं की अनेक काँग्रेसवाले सत्तापदावर असताना राम मंदिराची चेष्टा करत असत. पण व्यवस्था त्यांच्या हातात असल्यामुळे हिंदुंची देखील मुस्कटदाबी व्हायची. खरं तर मंदिर बांधकाम हा भारतीयांच्या स्वत्वाचा, श्रद्धास्थानाचा लढा. पुरातन भारतीय संस्कृती आणि अस्मितेचे प्रतीक. मात्र मुघल आक्रमकांनी हीच प्रतीके नष्ट करून टाकली होती. देशात वर्षानुवर्षे काँग्रेसी व्यवस्था अबाधित राहिल्याने पुरोगामी धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली भारतीय संस्कृती आणि इतिहास दाबून ठेवण्याचे पाप यांनी केलं. वर्षानुवर्षे लढा देताना असा एक दिवस पाहायला मिळेल जेव्हा अयोध्येत रामलल्ला पुनश्च विराजमान होईल. हे स्वप्न लढाई लढणाऱ्या तथा चळवळ राबवणाऱ्याचं होतं आणि तो क्षण जवळ आला. खरं तर धर्मयुगात देखील रावणाचा वध करण्यासाठी रामाला जन्म घ्यावा लागला, महाभारतात कंसमामाचा वध करायला श्रीकृष्णाला जन्म घ्यावा लागला. अशा कथा ऐकल्यानंतर अधर्म, असत्य, दुष्ट जिथे असते तिथे सत्य जन्माला येते हे त्रिकालाबाधित सत्य म्हणावे लागेल. या देशात केवळ मतांसाठी काँग्रेसवाल्यांनी आयुष्यभर रामाला शिव्या घातल्या. आता 22 रोजी रामलल्ला विराजमान होत आहे. त्याचे श्रेय घेण्यासाठी राज्य तथा देश पातळीवरले काँग्रेसवाले वेगवेगळ्या माध्यमातून धडपड करत असले तरी राम आमचा नाही राम भाजपाचा? असं म्हणत ज्यांनी कायदे आणि घटना पायदळी तुडवली, अधर्म जेव्हा राजकीय सत्तेच्या माध्यमातून वाढला तेव्हा या देशात 2014 ला पंतप्रधान नरेंद्र मोदी या नेतृत्वाचा उदय झाला. व्यवस्था बदल झाल्यानंतर ज्या काँग्रेसवाल्यांनी किंवा समाजवाद्यांनी न्यायालयापासून ज्या गोष्टी लपवल्या त्याची वस्तुस्थिती बदलत्या व्यवस्थेने न्यायदेवतेच्या समोर ठेवल्यानंतर रामाचा जन्म अयोध्येत झाला अशा प्रकारचा निर्णय लागला आणि उद्याच्या 22 रोजी भव्य राम मंदिर ज्यात रामलल्ला विराजमान होत आहेत. हे सर्व करण्यासाठी देशाच्या व्यवस्थेत पंतप्रधानाच्या रूपाने नरेंद्र मोदी यांनाच जन्म घ्यावा लागला. ज्यामुळे काँग्रेसच्या तावडीतून आमचा राम मुक्त झाला. देशातील नव्हे तर जगाच्या पाठीवरील रामभक्तांचे डोळे आसुसलेले आहेत ते केवळ अयोध्येत पवित्र स्थानावर रामलल्ला विराजमान होण्यासाठी. अयोध्यानगरी सजली असून ज्या वेळी प्रभू रामचंद्र वनवासातून अयोध्येला आले, त्या वेळी गुढ्या, पताका उभारून भाविक भक्तांनी त्यांचे स्वागत केले होते. तेवढाच आनंद खऱ्या अर्थाने आज केवळ भारत देशात नव्हे तर जगाच्या पाठीवरील हिंदू संस्कृती अंगीकृत करून चालणाऱ्या चराचर जीवामध्ये होताना दिसतो.

प्रभू रामचंद्राचा द्वेष ज्याप्रमाणे तत्कालीन काळात राक्षसी प्रवृत्तीने केला, त्या प्रवृत्ती आजही समाजात दिसून येतात. जसं की महाराष्ट्रात कारसेवकांच्याही भूमिकेवर संशय घेतला जातो. ज्यांनी कारसेवक म्हणून काम करताना जेल भोगले, त्यांनाही म्हटले जाते की हे नाटक आहे. याचाच अर्थ राक्षस प्रवृत्तीच्या लोकांनी रामचंद्राचं अस्तित्व कधीच मान्य केलं नाही. उद्याच्या कार्यक्रमासाठी अनेकांना अयोध्या ट्रस्टकडून निमंत्रण पत्र मिळाले. तरीदेखील केवळ मतांच्या लाचारीपोटी आलेले निमंत्रण ग्राह्य न धरता आम्ही किती व्यग्र आहोत? असं दाखवणारी प्रवृत्ती आजच्या राजकीय राक्षसी नेतृत्वामध्ये दिसून येते. पण रामलल्ला आएंगे, मंदिर वही बनायेंगे या घोषणा कारसेवकांच्या स्मृती उजळून टाकतात. बाकी काही असलं तरी प्रभू रामचंद्र आज अयोध्येत विराजमान होणार हा भारतवर्षातील भाग्याचा क्षण म्हणावा लागेल.




राम कुलकर्णी
भाजप राज्य प्रवक्ता, मो. 9422742577




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

गेल्या महिन्यात म्हणजे डिसेंबर २०२३ मध्ये मला श्रीक्षेत्र बदामीला जाण्याचा योग आला. बदामी येथील श्री शाकंभरी देवी आमची कुलदेवता असल्याने यापूर्वीही अनेक वेळा या ठिकाणी जाण्याचा आणि दर्शनाचा योग आला होता. पण यावेळची अनुभूती काही औरच होती. मातेचे मंदिर खूपच सुंदर सजवले होते. सगळीकडे स्वच्छता होती आणि अतिशय प्रसन्न वातावरण होते. बदामी येथे एक दिवस मुक्काम केला आणि तेवढ्या वेळात देवीच्या त्रिवार दर्शनाचा योग आला. गाभाऱ्यात उभे राहून अतिशय जवळून दर्शन झाले. नंतर समोरील सभामंडपात बसून देवीचे निवांत दर्शन घेतले. सुदैवाने भाविकांची फारशी गर्दी नसल्याने देवीचे दर्शन खूपच शांत आणि निवांतपणे घेता आले. पूर्वीच्या विजापूर आणि आताच्या बागलकोट जिल्ह्यात हे निसर्गरम्य आणि पवित्र ठिकाण आहे. हुबळी रेल्वेस्टेशन पासून फक्त आठ किमीच्या अंतरावर हे ठिकाण आहे. सोलापूर-गदग रेल्वे मार्गावर बदामी स्टेशन आहे. या स्टेशनवर फारसा गजबजाट किंवा गोंगाट नसतो. इथून देवीच्या मंदिराकडे जाण्यासाठी अनेक प्रकारच्या वाहनांची सोय आहे. बदामी हे तालुक्याचे ठिकाण असून येथील बाजारपेठ मोठी आहे. भाविकांच्या सोयीसाठी अनेक हॉटेल्स, लॉजेस उपलब्ध आहेत. बऱ्याचशा हॉटेलमध्ये यात्रेकरूंना अत्यंत कमी दरात जेवण, नाश्ता मिळू शकतो. अन्य जीवनोपयोगी वस्तूंच्या किमतीही बऱ्यापैकी कमी आहेत. बदामी येथील शाकंभरी देवीचं हे मंदिर अतिशय पुरातन आहे. याची दगडी बांधणी पाहताक्षणीच नजरेत भरते. या मंदिराचा अनेकदा जीर्णोद्धार करण्यात आल्याचे सांगितले जाते. शके ६०३ ( इ.स. ६८१ ) मध्ये या मंदिराचा पहिला जीर्णोद्धार करण्यात आला असावा असा अंदाज केला जातो.



## आनंदी पहाट

# आर्थिक बचत भविष्यातील तरतुदीसाठी उपयुक्त

आधुनिक केसरी

बचतीच्या अनेक फायद्यांपैकी एक म्हणजे ती आपल्याला दीर्घकालीन सुरक्षा प्रदान करते. भविष्य अप्रत्याशित आहे आणि आर्थिक आणीबाणी कधीही येऊ शकते. पैशांची बचत केल्याने आपल्या भविष्यातील खर्चासाठी तसेच अनियोजित आर्थिक गरजांसाठी सुरक्षा जाळे तयार करता येते. आपण जितकी जास्त बचत करत राहू तितकी आपल्याला अधिक मनःशांती मिळू शकते, कारण जीवन आपल्या गरजांपैकी कोणत्याही गोष्टीसाठी आपण अधिक चांगले तयार राहू शकतो. स्वातंत्र्य मिळाल्यावर पैशाची बचत करण्याचे महत्त्व कमी केले जाऊ शकत नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला स्वावलंबी बनवण्यात आर्थिक स्वातंत्र्य महत्त्वाची भूमिका बजावते. हे आपल्या आवडीनुसार आणि सोईनुसार जीवन जगण्यास मदत करते. आपला पैसा आपल्याला आवडत असलेल्या गोष्टींवर खर्च करण्याचे स्वातंत्र्य आणि अधिकार असून आरामदायी त्याचप्रमाणे समृद्ध जीवन आपण जगू शकतो. पैसे वाचवणे महत्त्वाचे का आहे, याचे आणखी एक कारण म्हणजे, ते आपल्याला आर्थिक कुवतीनुसार जोखीम घेण्यास अनुमती देते. जेव्हा आपल्याकडे पुरेसा पैसा असतो, तेव्हा आपण उत्पन्न मिळवण्याच्या तत्काळ दबावाशिवाय व्यवसाय सुरू करणे, व्यवसाय बदलणे आणि आपल्या आवडी शोधणे, यासारखी जोखीम घेऊ शकतो. पुरेशी बचत आपल्याला अधिक परिपूर्ण जीवन जगण्यास सक्षम करते.
आर्थिक बचतीमुळे निवृत्ती सारख्या भविष्यातील उद्दिष्टांबद्दल किंवा आरोग्यसेवेसारख्या अनपेक्षित खर्चांबद्दल आपल्याला कमी ताण पडण्याची शक्यता असते. जीवनातील विविध परिस्थितींमध्ये नेव्हिगेट करण्यासाठी आपल्याकडे पुरेसा निधी आहे, हे जाणून बचतीमुळे आपल्याला आराम आणि आनंद मिळतो. बचत आपल्याला चक्रवाढ पद्धतीचा लाभ घेण्याची संधी देते. चक्रवाढ व्याज आपल्या सुरुवातीच्या बचतीत नियतकालिक अंतराने जोडले जाते, जसे की वार्षिक व्याजाची पडणारी भर होय. हे व्याज केवळ आपल्या सुरुवातीच्या रकमेतच नाही, तर पूर्वी मिळवलेल्या व्याजातही जोडले जाते.



आधुनिक केसरी

## परमार्थ करावा | हळुवार ||

टाळाचिया संगे | बोले मन माझे ||
संसाराचे ओझे | दूर झाले ||१||
थाटला संसार | अभंगाच्या दारी ||
आता तूचि तारी | पांडुरंगा ||२||
नामाचा गजर | पडताच कानी ||
बोले संतवाणी | काळजात ||३||
कर्माच्या संगती | जगण्याचे हीत ||
सूरमयी गीत | प्रारब्धाचे ||४||
पा-पुण्य सार | भावार्थी जाणावा ||
परमार्थ करावा | हळुवार ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

स्त्री सांपडली सुंदर । गुणवंत आणी चतुर ।
म्हणे माझें भाग्य थोर । वृद्धपणीं ॥ २६ ॥
ऐसा आनंद मानिला । दुःख सर्वही विसरला ।
तंव तो गल्बला जाला । परचक्र आलें ॥ २७ ॥
अकस्मात धाडी आली । कांता बंदीं धरून नेली ।
वस्तभावही गेली । प्राणीयाची ॥ २८ ॥


## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

नहिं कान्क्षा नहिं द्वेष है,
सम्पति आवे जाय ।
आप निरन्तर मगन हैं, अनुभव सुख
उर पाय ।।४२।।(स्वर्वेद प्रथम मण्डल
अष्टम अध्याय) ०१/०८/४२
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अनुभवी संतांना कुठाल्याही वस्तूची इच्छा होत नाही आणि कुठाल्याही पदार्थांप्रति द्वेष असत नाही. ज्या पदार्थांपासून आधी दुःख मिळाले आहे, त्या दुखदायी पदार्थांना बघीतल्यावर किंवा त्याच्या स्मरणाने त्या पदार्थांप्रति जो क्रोध निर्माण होतो, त्याला द्वेष असे म्हणतात. संपत्तीच्या येण्याने किंवा जाण्याने संतांना राग द्वेष होत नाही. ते आपल्या अनुभव सुखात सदैव निमग्न असतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.





गोड हास्य-भाळी टिळा,
फुलणार आज भक्तीचा मळा..
निळ्या अन् काळ्या पाषाणात,
पाझरल्या प्रतिष्ठेच्या प्राणकळा!
सुर्य प्रतिमेची मस्तकी प्रतिभा,
मुखकमली सौख्य-शांती भाव..
शंख-चक्र-गदा अन् स्वस्तीक,
स्मरणाने तरते भवसागरी नाव!
डाव्या बाजूला पाच अवतार,
उजव्या बाजूला अवतार चार..
आभुषणांनी सजलेली मुर्ती
मनमोहक दिसते सुंदर फार!
प्रत्येक गाव बनले अयोध्या,
टाळासह मृदंग झंकारणार..
मंगलवाद्यांच्या मंत्रोपच्चारात,
अवधनगरीत आज राम येणार !
**राजेंद्र काळे, बुलडाणा ९८२२५९३९२३**

# भक्त आणि परमात्मा एकरूपच असतात

आधुनिक केसरी

‘आमच्या हातून वारंवार चुका होतात’ असे तुम्ही म्हणता. लहान मुलगा चालताना अडखळतो, पडतो किंवा बोलताना बोबडे बोलतो त्याचे आईबापांना कौतुकच वाटते. त्याचप्रमाणे तुमच्या चुकांचे मला कौतुक वाटते. चुका सावरण्याच्या तुमच्या प्रयत्नांचेही तसेच कौतुक वाटते. म्हणून त्याबद्दल तुम्ही काहीही मनात आणण्याचे कारण नाही. गुरूने एकदा सांगितले की, ‘तुझे मागचे सर्व गेले, पुढे मात्र वाईट वागू नकोस’ तर शिष्याने ते श्रद्धेने खरे मानावे. आपल्या हातून होणाऱ्या चुकांचे परिमार्जन नामच करू शकते. भगवंताचे नाम हे सर्व रोगांवर रामबाण औषधच आहे. नामाचे हे औषध सतत थेंब थेंब पोटात गेले पाहिजे. ऑफिसमध्येसुद्धा ते आपण बरोबर घेऊन जावे. विद्वान्, अडाणी, श्रीमंत, गरीब सर्वांना हे औषध सारखेच आहे. जो पथ्य सांभाळून हे औषध घेईल त्याला गुण लवकर येईल. एखादा मुलगा ‘मी विहिरीत उडी घेणार’ म्हणून हट्ट धरून बसला तर बापाने त्याचा हा हट्ट पुरवायचा का त्याला समजावून किंवा



तोंडात मारून तिथून बाजूला काढायचे ? त्याप्रमाणे तुमचे विषय मागण्याचे हट्ट आहेत. खरा भक्त कधीही दुःखी-कष्टी असत नाही, आपल्या समाधानात असतो; मग तो कितीही दरिद्री किंवा व्याधिग्रस्त असेना ! अमुक एक हवे ते मिळाले नाही म्हणजे सामान्य माणसाला दुःख होते. भक्ताला कसलीही आस नसते, त्यामुळे त्याला दुःख नसते. तो आणि परमात्मा एकरूपच असतात. परमात्म्याची इच्छा हीच त्याची इच्छा असते. सगुणाची भक्ती करता करता त्याला ‘मी’ चा विसर पडत जातो. ‘मी नसून तूच आहेस’ ही भावना दृढ होत जाते. शेवटी ‘मी’ नाहीसा झाला की राम, कृष्ण, वगैरेही नाहीसे होतात आणि परमात्मा तेवढा शिल्लक उरतो.
आजारामधून उठलेल्या अशक्त माणसाने जसे काठीच्या आधाराने चालावे, त्याप्रमाणे प्रांपचिकाने सगुणभक्तीने तरून जावे. देहबुद्धी असणाऱ्या माणसाला सगुणावाचून भक्तीच करता येणार नाही. भगवंताला आपण सांगावे की, ‘भगवंता, तुझी कृपा मजवर असू दे; आणि कृपा म्हणजे, तुझे स्मरण मला अखंड राहू दे.’ यातूनच त्याची भक्ती उत्पन्न होईल. भगवंतावाचून कशातही समाधान नाही. त्याच्याशिवाय जगण्यात आनंद नाही. जो भगवंताचा झाला, म्हणजे त्याच्या नामात राहिला, त्याला जगण्याचा कंटाळा येणार नाही.
५५. परमात्म्याला प्रपंचरूप बनविण्याऐवजी आपण प्रपंचाला परमात्मरूप बनवावे.

सोमवार, २२ जानेवारी २०२४
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १५७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) MONDAY 22 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-157 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# वनवास संपणार

## अयोध्येत आज श्री रामलल्ला मूर्तीची प्रतिष्ठापना होणार

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या :** परमपावन अयोध्याधामात श्री रामलल्ला पाचशे वर्षांचा वनवास संपवून पुन्हा आपल्या मंदिरी विराजमान होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दुपारी 12 वाजून 29 मिनिटांनी विधिवत श्री रामलल्ला मूर्तीची मंदिराच्या गर्भगृहात प्रतिष्ठापना होणार आहे. या अद्भुत, भव्य सोहळ्यानिमित्त देशभरातील नागरिकांचा उत्साह शिगेला पोहचला असून ठिकठिकाणी शोभायात्रा, देखावे, मिरवणुका आणि जय श्रीराम जयघोषाने शहरांसह गावेही दुमदुमली आहेत.



देशातील सर्वच मंदिरांची साफसफाई सुरू आहे. कुठे रामभक्तांसाठी प्रचंड लाडूचा प्रसाद बनवला जात आहे तर कुठे राम मंदिराच्या प्रतिकृती बनवल्या जात आहेत. हजारो निमंत्रित रामभक्त अयोध्येच्या दिशेने रवाना झाले असून रेल्वे स्टेशन, बस स्थानके व अनेक सार्वजनिक ठिकाणी प्रतिष्ठापना सोहळ्याचे थेट प्रक्षेपण पाहण्याची व्यवस्था केली जात आहे. एकंदरीतच देशाला राममय करणारा हा सोहळा याचि देही याचि डोळा अनुभवण्यासाठी जनसामान्य आतुर झाल्याचे चित्र आहे.

# आसाममध्ये ‘भारत जोडो न्याय यात्रे’वर हल्ला

आधुनिक केसरी न्यूज

**सोनितपूर :** काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि वायनाडचे (केरळ) खासदार राहुल गांधी यांनी १४ जानेवारी रोजी मणिपूरमधून ‘भारत जोडो न्याय यात्रे’ला सुरूवात केली. ही पदयात्रा १८ जानेवारी रोजी आसाममध्ये दाखल झाली आहे. २५ जानेवारीपर्यंत ही यात्रा आसामच्या वेगवेगळ्या जिल्ह्यांमधून मार्गक्रमण करणार आहे. दरम्यान, आसाममध्ये राहुल गांधींच्या पदयात्रेला भाजपाकडून विरोध होत आहे. २१ जानेवारी आसामच्या सोनितपूर भागातील जमुगुरीघाट येथून ही यात्रा जात असताना भाजपा समर्थकांनी काँग्रेसचे राज्यसभेचे खासदार जयराम रमेश यांच्या कारवर हल्ला केला. या हल्ल्याचा एक व्हिडिओ काँग्रेसने समाजमाध्यमांवर शेअर केला आहे.






# जय श्रीराम

आधुनिक केसरी

ज्या दिवसाची अवघ्या देशाला प्रतीक्षा होती, तो दिवस आज अखेर उजाडलाच. आज सोमवारी 22 जानेवारीला अयोध्येतील राम मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होत आहे. सोहळ्यासाठी येणाऱ्या पाहुण्यासाठी अयोध्यानगरी सज्ज झाली आहे. प्रभू श्रीरामाच्या स्वागतासाठी राममंदिर फुलांनी आणि विद्युत रोषणाईने सजली. राममंदिराची मूर्ती मंदिरातील गाभाऱ्यात विराजमान झाली असून प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी 7 हजार 140 निमंत्रक येणार आहेत. शिवाय 112 परदेशी पाहुणेही सहभागी होतील. रामनगरी अयोध्येत 150 चार्टर्ड विमान उतरणार आहेत. व्हीव्हीआयपी घडामोडींमुळे अयोध्यानगरीवर छावणीचे रुप आले आहे. वाल्मिकी रामायणानुसार अयोध्येत प्रभू रामाचा जन्म झाला. अनेक वर्ष अयोध्येत रामाचे राज्य होते. त्यानंतर प्रभू रामाने जल समाधी घेतल्याचे सांगितले जाते. त्यानंतर अनेक वर्षानंतर उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य अयोध्येत आला होता. त्याने या परिसरात काही चमत्कारीक घटना पाहिल्या. त्यानंतर विक्रमादित्याने या ठिकाणी खोदकाम सुरू केले. या ठिकाणी श्री रामाचे अस्तित्व असल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याने या ठिकाणी रामाचे मंदिर बांधले. या मंदिरात नियमितपणे प्रभू रामाची पूजा होत होती. त्यानंतर अनेक राजे आले आणि गेले. 14व्या शतकात मुघलांची सत्ता आली. 1525मध्ये मुघल शासक बाबरचा सेनापती मीर बांकीने राम जन्मभूमीवरील मंदिर उद्ध्वस्त करून त्या ठिकाणी मशीद बांधली. तीच बाबरी मशीद. तेव्हापासून मंदिर आणि मशिदीचा वाद सुरू होता. नंतर ही मशीदही पाडल्या गेली. त्यानंतर हे प्रकरण सुप्रीम कोर्टात गेले. अखेर कोर्टाने वादग्रस्त जागेवर राम मंदिरच असल्याचा निर्वाळा दिला. त्यानंतर या ठिकाणी राम मंदिर बांधण्याचं काम सुरू होऊन पूर्ण झाले आहे. अयोध्येचा राजा श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे देशभरात जणून दिवाळी साजरी होत आहे. गेल्या 500 वर्षांपासून इतिहास असलेल्या लढ्याला यश आले असून रामलल्लाची त्याच्या जन्मस्थानी प्राणप्रतिष्ठा करण्यात येत आहे.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# ४९२ वर्षांनंतरची प्रतीक्षा संपली

आधुनिक केसरी

**तब्बल ४९२..वर्षांनंतर अखेर तो दिवस आला आहे.ज्या दिवसाची वाट रामभक्त बघत होते.तो शुभ मुहूर्त आला आहे. अयोध्येतील भव्य श्री रामजन्मभूमी मंदिराच्या उभारणीसाठी ५ शतकांची प्रतीक्षा आता संपवण्याचा ऐतिहासिक क्षण आला आहे. यामुळे करोडो रामभक्तांच्या प्रतिक्षेसोबतच त्यांच्या सर्व शंका-कुशंकाही संपणार आहेत. त्या हजारो दिवंगत आत्म्यांना शांती लाभेल, ज्यांनी या ठिकाणी भव्य राम मंदिर उभारण्याचा त्यांचा संकल्प आणि स्वप्न साकार होण्याची वाट पाहत या जगाचा निरोप घेतला होता.**

राम भक्तांना फक्त त्या क्षणाची वाट होती की जेव्हां रामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना गर्भगृहात होईल आणि तो क्षण देखील जवळ आला आहे.

देशभरातील नागरिकांना प्रतीक्षा असलेल्या अयोध्येतील राम मंदिराचं उद्घाटन येत्या २२ जानेवारी रोजी केलं जाणार आहे. या दिवशी मंदिरात रामलल्लांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ही प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. श्री राम जन्मभूमी ट्रस्टने देशभरातील अनेग दिग्गजांना, मोठ्या नेत्यांना, कलाकार, खेळाडू आणि साधू-संतांना या सोहळ्याचं निमंत्रण पाठवलं आहे. हजारोंच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडेल.

दरम्यान, १८ जानेवारी रोजी मंदिराच्या गाभाऱ्यात श्रीरामाची मूर्ती ठेवण्यात आली. या मंदिरातला मूर्तीचा पहिला फोटो आता समोर आला आहे. ही मूर्ती मंदिरात आणताना एका वस्त्रात गुंडाळली होती. तसेच मूर्तीच्या डोळ्यांवर पट्टी बांधण्यात आली होती. आता ती पट्टी काढण्यात आली आहे. त्यामुळे श्रीरामाचं दर्शन झालं आहे. मंदिरात रामलल्ला म्हणजेच बाळ रुपातील रामाची मूर्ती असणार आहे. तसेच शिल्पकार अरुण योगीराज यांनी शाळीग्राम दगडापासून घडवलेली रामाची मूर्तीही असणार आहे. अरुण योगीराज यांनी घडवलेली मूर्ती गाभाऱ्यात ठेवण्यात आली आहे. याच मूर्तीचा फोटो समोर आला आहे. सोशल मीडियावर या फोटोची चर्चा होतेय. रामाची ही मूर्ती खूप आकर्षक आहे. मधुर हास्य, कपाळावर टिळा, हातात सोन्याचा धनुष्यबाण असलेल्या रामाचं लोभस रूप या मूर्तीत पाहायला मिळालं आहे. मूर्तीचा हा फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या उभारणीच्या कामात गुंतलेल्या सर्व कामगारांनी गाभाऱ्यात मूर्ती ठेवल्यानंतर हात जोडून प्रार्थनादेखील केली. तसेच रामनामाचा जप केला.

अयोध्या [रघुवर्शरण] गर्भगृहाच्या पूजेने राम मंदिराचा प्रदीर्घ भूतकाळापासून वर्तमानापर्यंतचा प्रवास सुवर्णमध्य पार होईल. अनेक वर्षांपूर्वी अस्तित्वात आल्यापासून राम मंदिराला अभूतपूर्व वैभव आणि प्रतिष्ठा मिळाली मिळेल तर हिंदू अस्मितेच्या या वारशालाही अवहेलना आणि अपमानाला सामोरे जावे



लागले आहे. आता त्याची पूर्तता होईल. अयोध्या आणि त्यांच्या जन्मस्थानाच्या प्रतिष्ठेचा अंदाज श्रीरामाच्या जन्माच्या वेळी आणि एक आदर्श राजा, मर्यादा पुरुषोत्तम आणि सृष्टीचा नायक म्हणून त्यांची स्थापना झाली तेव्हा सहज अंदाज लावता येतो.श्री राम आपल्या मायदेशी निघून गेल्यानंतर, त्यांचा मुलगा कुश याने त्यांच्या प्रसिद्ध वडिलांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मस्थानी एक विशाल मंदिर बांधले. तेव्हापासून हे मंदिर श्रीरामांप्रती श्रद्धा, आदर आणि आदराचे प्रतीक बनले आहे. युगायुगांच्या प्रवासात राम मंदिराची महिमा आणि प्रतिष्ठा शिगेला स्पर्श करत राहिली. कालांतराने विश्वासाच्या या महान स्मारकाची चमक मंदावली असली तरी तिला नवीन चमक आणि नवीन वैभव प्राप्त झाले आहे.

त्रेतायुगात श्रीरामाच्या सूर्यवंशी वंशजांच्या काळात रामजन्मभूमीवर बांधलेले भव्य आणि दिव्य मंदिर पूर्ण जबाबदारीने सांभाळले गेले. महाभारत युद्धात कौरव सैन्याच्या वतीने युद्धात भाग घेतलेल्या आणि अभिमन्यूच्या हातून मारल्या गेलेल्या अयोध्येच्या शेवटच्या सूर्यवंशी शासकाचा उल्लेख मोठ्या पराक्रमाच्या रूपात आहे. त्यांच्या निधनानंतर अयोध्येसह राम मंदिराची चमकही धुळीस मिळण्याचे संकेत मिळत आहेत. याशिवाय, महाभारत युद्धानंतर श्रीकृष्ण अयोध्येत आले आणि त्यांनी आपल्या पूर्ववर्ती श्रीरामाच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला, अशीही वस्तुस्थिती सांगितली जाते.

दोन हजार वर्षांपूर्वी भारतीय लोककथांचे नायक महाराज विक्रमादित्य यांचे अयोध्येत आगमन झाल्याचा उल्लेख आहे, तेव्हा अयोध्येची ओळख हिरावून घेतली गेली. विक्रमादित्याने त्रेता युगातील अनेक स्थळे आणि अगदी पूर्वीच्या पौराणिक स्थळांसह संपूर्ण अयोध्येचा जीर्णोद्धार तर केलाच, पण रामजन्मभूमीवर भव्य दिव्य मंदिरही बांधले. या मंदिराच्या भव्यतेबद्दल आजही अनेक दंतकथा प्रचलित आहेत. विक्रमादित्यने बांधल्यानंतर एक हजार वर्षांनी रामजन्मभूमी दृष्टीस पडली. रामभक्तांचा हा वारसा दीर्घकाळ दुःखाचा सामना करत राहिला. प्रथम सालार मसूद गाझीने अयोध्येसह रामजन्मभूमीचे नुकसान केले आणि १५२८ मध्ये मुघल आक्रमक बाबरच्या आदेशानुसार, त्याचा सेनापती मीर बाकीने तोफेने राम मंदिर उद्ध्वस्त केले. त्यानंतर सुमारे ५०० वर्षे रामजन्मभूमीच्या सन्मानासाठी सातत्याने संघर्ष सुरू होता. ९ नोव्हेंबर २०१९ रोजी सुप्रीम कोर्टाने रामलल्ला यांच्या बाजूने निकाल दिल्याने दीर्घ संघर्षाला यश आले. त्यानंतर प्रगतीचा एक नवा टप्पा सुरू झाला आणि ५ ऑगस्ट २०२०रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राम मंदिराचे भूमिपूजन केले तेव्हा हा प्रवास एक हजार वर्षे अखंड आणि येत्या काळात अखंड राहील अशा भव्य मंदिराच्या संकल्पाने पार पडला. सोमवारी या ठरावाचे भव्य-दिव्य मंदिरात रूपांतर होणार असून, त्यानुसार भव्य गर्भगृहात रामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होणार आहे. आणि रामलल्लाचे दर्शन होणार आहे.



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

# हर मन में राम... कण कण में राम !

आधुनिक केसरी

**५०० वर्षांचा कालखंड हा थोडा थोडका नाही. मानवाच्या कित्येक पिढ्या या कालखंडात निघून गेल्या. या ५०० वर्षांत अयोध्येने श्रीरामजन्मभूमीवरील आक्रमकांचा विध्वंस पहिला, न्यायालयीन खटले पाहिले, हिंदू मुस्लिम वाद पहिले, कारसेवकांचे बलिदान पाहिले, शासनकर्त्यांचे जुलूम पाहिले, दंगली पाहिल्या आणि आज पुन्हा एकदा अयोध्येमध्ये आलेले रामराज्य पाहिले. ज्या मंदिराचा ५०० वर्षांपूर्वी विध्वंस झाला ते मंदिर आज भव्य आणि दिव्य स्वरूपात अयोध्येत उभे राहिलेले पाहताना अयोध्याभुमीही आज पुलकित झाली आहे. केवळ अयोध्याभुमी नाहीतर समस्त भारतभूमी श्रीरामांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे. राम मंदिराचे उदघाटन हा एक अलौकिक सोहळा आहे.**

जगभरातील कोट्यवधी रामभक्त या सोहळ्याकडे टक लावून आहेत. स्वर्गातील देवताही हा सोहळा पाहण्यासाठी आसुसलया असतील. श्रीरामलल्ला प्रतिष्ठापनेच्या दिवशी उगवलेला सूर्यही स्वतःला भाग्यवान समजत असेल, कारण आजच्या या पावन दिवसाची नोंद भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी केली जाणार आहे. हा दिव्य सोहळा याची देही याची डोळा पाहायला मिळतो आहे हे आजच्या संपूर्ण पिढीचे भाग्य आहे, श्रीराम मंदिर निर्माणकार्यात आणि प्रतिष्ठापना सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचे, प्रत्येक वस्तूचे आणि प्रत्येक उपकरणाचे हे भाग्य आहे. असे भाग्य प्राप्त होण्यासाठी अनेक जन्मांची पुण्याई पदरी असावी लागते. आज साऱ्या भारतविश्वात केवळ राम आणि राम आहेत. प्रत्येक रामभक्ताच्या मनात राम आहेत, रोमारोमात राम आहेत, सृष्टीच्या कणाकणात राम आहेत. हा राम असाच मनात साठवून ठेऊया ! रामजन्मभूमीतील श्रीराम मंदिर प्रतिष्ठापना सोहळा संपूर्ण भारतभरात एक उत्सवासारखा साजरा केला जाणार आहे. यानिमित्ताने देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अनेक ठिकाणी यानिमित्ताने मिरवणुका, शोभायात्रा आणि पालख्या काढण्यात येणार आहेत. आजच्या पिढीचा उत्साह पाहता यांमध्ये मंगल वाद्यांसह डीजेचाही समावेश केला जाणारच. यावर वाजणारी गाणी जरी श्रीरामाची असली तरी त्याचा धडकी भरवणारा आवाज कुणाच्या आरोग्याची हानी करणार नाही याचेही भान रामभक्तांनी ठेवायला हवे. नाचताना आपण खरंच श्रीरामाच्या भक्तीत नाचत आहोत कि स्वतःच्या जीवाची मौज करून घेत आहोत याचीही जाणीव असायला हवी. मिरवणुकांमध्ये भांडणे, मारामाऱ्या होणार नाहीत, शिव्या आणि अपशब्दांचा वर्षाव होणार नाही, वाहतुकीला आणि रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांना त्रास होणार नाही याचीही दक्षता घ्यायला हवी. कारण आपल्यामुळे कुणाला त्रास झालेला प्रभू श्रीरामांनाही आवडणार नाही. भगवे ध्वज नाचवताना त्यावर असलेल्या श्रीरामांचा अवमान होणार नाही, त्याचा योग्य तो मान राखला जाईल याकडेही आपले लक्ष असायला हवे. खरेतर श्रीरामांचे आगमन हा मौजेचा नाही, तर अनुभवायचा विषय आहे. त्यामुळे या दिवशी मन एकाग्र करून त्याला श्रीरामाच्या संकीर्तनात गुंतवायला हवे. श्रीरामाचा नामजप, श्रीरामरक्षा स्तोत्र, श्रीरामाची भक्तिगीते, गीतरामायण, श्रीरामाची भजने ऐकायला आणि म्हणायला हवीत. शरीराने जाता नाही म्हणून काय झाले मनाने श्रीरामजन्मभूमी अयोध्येत आपण सर्वच जण जाऊ शकतो, अगदी गर्भगृहात जाऊन श्रीरामलल्लाच्या नूतन मूर्तीच्या चरणी शीर टेकवू शकतो. त्याची पाद्यपूजाही करू शकतो. श्रीरामाचा सहवास आणि त्याचे आशीर्वाद मिळवण्यासाठी बाह्य अवडंबरापेक्षा मन एकाग्र करून या मंगलदिनी त्याची मानसपूजा करूया. चंदनाच्या पाटावर आणि चांदीच्या ताटामध्ये त्याचे कोमल चरण ठेवूया. शरयूच्या मंगल जलाने आणि गाईच्या दुधाने त्याचे पदप्रक्षालन करूया. रेशमी वस्त्राने त्याचे चरण पुसूया, त्यावर हाताने उगाळलेल्या चंदनाने शुभचिन्ह काढूया, त्यावर चमेली आणि पारिजाताची फुले वाहूया, सुगंधी फुलांचा पुष्पाहार श्रीरामांना अर्पण करूया, सुगंधी धूप अगरबत्तीने त्याला ओवाळुया, तुपाच्या निरांजनाने प्रज्वलित केलेल्या ज्योतीसह आत्मज्योतीनेही त्याची आरती करूया, सात्विक फळांचा नैवेद्य दाखवूया, तन, मन, धन, अहं आणि बुद्धी सर्वकाही त्याच्या चरणी वाहूया आणि तू सतत आमच्यासोबत राहा अशी आर्त भावाने त्याच्या चरणी प्रार्थना करूया. तो एकदा आपल्या अंतर्मनात आला कि आपले जीवन खऱ्या अर्थाने सार्थक होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# कडेगावकर दरवर्षी करतात प्रभू श्रीरामाच्या नामाचा घोष

## रामनवमीची 185 वर्षांची भक्तिमय परंपरा

आधुनिक केसरी न्यूज


**सदानंद माळी**

**कडेगाव :** कडेगाव म्हटलं की राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक असं संबोधलं जात. हिंदू मुस्लिम ऐक्याचा मोहरम सण, रामनवमी उत्सव, भैरवनाथ गोविंदगिरी उत्सव हे सर्व जातीय ग्रामस्थ सलोख्याने व एकदिलाने एक जिवाने आनंदोत्सव साजरा करत असतात असे हे राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक असलेल्या कडेगावात रामनवमी उत्सवाची परंपरा गेली 185 वर्ष अव्यातपणे सुरू आहे. सामाजिक ऐक्याच्या व एकतेच्या कसोटीवर लाभलेल्या रामनवमी उत्सव एक आदर्श मानदंड मानला जात आहे. कडेगावच्या रामनवमीचे वेगळी वैशिष्ट्य कोणती 185 वर्ष कशी व कोणी निर्माण केली? स्वखर्चाने गेल्या सहा पिढ्यापासून रामनवमी उत्सव कसा चालतो ?या उत्सवाचे गावाला किंवा समाजाला कोणते योगदान दिले आहे? या निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शोध श्री राम जन्मभूमी मंदिर अयोध्याच्या रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने आपण आढावा घेऊया.

185 वर्षांपूर्वी संस्थान आणि देशपांडे यांच्या श्री विठ्ठल रुकमाई मंदिरात राघवेंद्र स्वामी यांची रामायणावर सुश्राव्य प्रवचने होत होती. रामायण प्रत्येकच्या जीवनाचा विषय आहे रामायणाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये आपल्याला भेटणारी पात्रे प्रत्येक स्वभावाची, प्रत्येकप्रवृतीची,कदाचित यामुळेच या पात्राचंच नेहमी आपल्या मनात अढळ स्थान आहे.

यामुळेच या रामायण कथेची गोडी ग्रामस्थांना चांगली लागली यातून कडेगाव येथे रामनवमी उत्सव साजरा होण्यासाठी पाऊल उचलण्यात आले अन् समर्थ रामदासाप्रमाणे कडेगावात ही रामनवमी उत्सव सुरू करावा त्याप्रमाणे 1761 व इसवी सन 1839 साली या रामनवमी उत्सवात प्रारंभ झाला .कडेगावलाव पुण्याहून येऊन रामनवमी साजरी करण्याची जबाबदारी रामकृष्ण बुवा माटे व त्यांचे शिष्य पंडित बुवा यांनी घेतली होती. त्यानंतर त्यांचे वंशज नारायणराव माटे व त्यांचे चिरंजीव अभय माटे आजही सहकुटुंब येऊन कडेगाव येथे रामनवमी उत्सवात सहभागी होऊन यशस्वीपणे रामनवमी उत्सव साजरा करतात सन 1925 साली रहिमतपूरचे राम उपासक कै अतीतकर यांनी राम, सीता, लक्ष्मण यांच्या संगमरवरी मूर्तीची स्थापना कडेगाव येथील राम मंदिरात केली . कालेकर बुवा स्वामी, विष्णुबुवा सिद्ध ,आळंदीचे नरसिंह सरस्वती, पुण्याचे जंगली महाराज यांनी या राम मंदिरात मुक्काम करून ग्रामस्थांना राम भक्तीबरोबरच आशीर्वाद दिले आहेत तर श्रीधर स्वामी, शिरोळकर स्वामी, वाडीकर जेरे स्वामी, कोल्हापूरचे घुमरे स्वामी ,वाडीचे शंकर स्वामी तसेच गोंदवले महाराज यांच्या वास्तवाने मंदिर पुनित पावन झाले आहे. हवालदार कुटुंबियाकडून ध्वज आणून त्याची उभारणी करून तसेच श्रीमंत देशपांडे कडून छबिण्याची मारुतीची मूर्ती आणून उत्सवाला प्रारंभ होतो असा हा गेली 185 वर्ष परंपरा असलेला रामनवमी उत्सव कडेगावकरांच्या रामलल्लाच्या भक्तीचा दरवर्षी होणारा रामभक्तीच्या जपाचा दरवर्षी सोहळा साजरा होत असतो.









# रामायण आणि जनमनातील श्रीराम



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**प्रभू रामचंद्राचे खरे जीवन कार्य लोककथांच्या माध्यमातून प्रकट होते कारण अरण्य कांडामध्ये प्रभू रामचद्रांना खरी साथ वनवाशी लोकांनी दिली. जनमनातील श्रीरामाच्या कर्तृत्व हा शोध महत्त्वाचा ठरतो. भारतीय संस्कृतिमध्ये श्रीरामाचे स्थान सर्व श्रेष्ठ असून नित्य जिवनात वंदनीय ठरले आहे. भारतीय खेड्यामध्ये माणूस एकमेकांना भेटला की राम राम असे म्हणून अभिवादन करतो. त्याचे कारण म्हणजे, भारतीय समाज माणसावर पडलेला रामायणाचा सखोल प्रभाव हे होय. रामायण व महाभारत ही महाकाव्ये स्मृती साहित्यामध्ये मोडतात. भारतीय दूरदर्शवर रामानंद सागर यांनी रामायण ही मालिका सादर केली तेंव्हा भारतामधील सर्व जाती धर्मांचा एवढा प्रतिसाद होता की, त्यावेळी रस्त्यावर शुकशुकाट असे.**

त्यामुळे प्रत्येक भारतीयाच्या धमन्यामध्ये रामांचा विचार शतकानुशतके गतिमान प्रवाहासारखा वाहत आहे. वनवाशी भागातील लोककथा, परंपरा आणि श्रवण संस्कृती एवढी जिवंत आहे की, छत्तीसगढ व झारखंड राज्यातील पाच वर्षाची मुलगी सुद्धा राम कथा गाऊ लागते. प्रभू रामचंद्रांनी 14 वर्षाच्या वनवास काळात सारा देश पाहिला, लोक जिवन अनुभवले, ऋषीमुनींच्या भेटी घेतल्या आणि भारतीय संस्कृतिचा प्रवाह समृद्ध केला. जो देश पाहतो, लोकांची दुःखे समजून घेतो, तो खरा महात्मा असतो. खरे रामायण जसे महर्षी वाल्मिकी यांच्या सात अध्यायातील 24 हजार संस्कृत श्लोकामध्ये जसे प्रकटले आहे त्याहीपेक्षा ते पारंपरिक लोक गीतातून अधिक जिवंत पणे प्रकटले आहे. या लोक गीतांचे अध्ययन संकलनातून व विश्लेषणातून राम संस्कृती पूर्णपणे करण्यासाठी हजारो वनवाशी संशोधकांची वाट पाहत आहेत.

**लोक रामायणाचे मर्म :** नदी अखंडपणे वाहते आणि वाळुच्या कणाबरोबर सोन्याचे कण मागे ठेवते, तश्या राम कथा लोकपरंपरेतून कणा कणाने विखूरल्या आहेत. त्यांचे एकत्रीकरण करूण, त्या द्वारे लख्ख व तेजः पुंजप्रकाश देणारे नवे साहित्य अलंकार या रत्नातून घडवीता येतील, ही संशोधकांची जबाबदारी आहे. प्रभूरामचंद्र, लक्ष्मण, सिता यांची दंडकारण्यात पाऊले जशी पडत गेले तसे रामायण पुढे सरकत गेले. या देशातील सामान्य, दुःखी, कष्टी, गरिब माणूस हा रामायणाचा खरा साक्षिदार आहे. त्यांच्या मुखातील उद्‌गार हे राम क्रांतीचा एल्गार बनून अजरामर झाले आहेत. त्यामुळे रामकथांची रचना, गुंफन मुळ कथेला अनुसरून कशी करावयाची हा खरा प्रश्न आहे. मुळ रामायणामध्ये काळानुसार अनेक प्रक्षेप घडून आले, त्यामुळे मिथक आणि सत्य यामध्ये सुसंगती लावणे हे अवघड काम आहे, असे प्रा. नरहर कुरंदकर म्हणतात. या कामासाठी अधुनिक युगामध्ये किती तरी नव्या वाल्मिकींची गरज आहे. भारतीय संस्कृतिमध्ये जीवनमुल्ये, नैतिक विचार तसेच नागरी सदगुण यांची पेरणी रामायणाच्या माध्यमातून झाली आहे. 24 हजार श्लोकांच्या पाचशे पाणी रामायणातील सात खंडाच्या पलिकडे जाऊन किती तरी अज्ञात व अप्रकाशित माहिती उजेडात आणावी लागणार आहे. रामायण ही वेदा प्रमाणेच अनुष्टुभ छंदात असून ते सामुदायिकपणे गाता येतात. सात काडांतील म्हणजे अध्यायातील हे महाकाव्य शैलीदार इतिहास कथनाचा अव्वल नमूना आहे. भूतकाळातील घटनांचे पुरावृत्त कथन करणारा हा एक उत्कृष्ठ सज्ञा पण नमूना होय (मॉडेल). मानवी जिवंनातील उद्दिष्टांच्या शिकवणूकीवर या कथनामध्ये वाल्मिकीनी भर दिला आहे, त्यापेक्षा अधिक प्रभावी असे चित्रण लोककथातून आले आहे. प्रत्यक्ष वाल्मिकी रामायणापेक्षाही अनेक रोमाचंक व चित्तथरारक कथा रामकथांच्या माध्यमातून जिवंतपणे प्रकट होतात. या लोककथांचे संकलन आणि जोडणी करून नव्याने विश्लेषण करण्यासाठी हजारो वनवासी, नव्या संशोधकाची वाट पाहत आहेत. त्यामुळे वनवासात असतांना घडलेल्या विविध प्रसंगाचे नव्याने अध्ययन करण्याची गरज आहे त्यातून नवे कोंदण व नवे हिरे प्रकाशात येतील. त्यामुळे जनमाणसातील प्रभू रामचंद्राची नवी तेजस्वी प्रतीमा नव्याने समोर येऊ शकते.

श्रीलंका व नेपाळ प्रमाणे आग्नेय आशियाई देशामध्ये अनेक बेटापर्यंत रामायण पोहचले आणि रामायणाने तेथे लोक परंपरेत मुळ ही धरले. बौद्ध जैन रामायणाप्रमाणे कानडी, तेलगू, तमिळ, मल्याळम, या दक्षिणी भाषामध्ये रामकथा प्रकट होतात. पण काकतीय राजघराण्यातील अक्कमा या राणीने तेलगू भाषेत



रामायण लिहीले. फ्रेंच इन्डो चाईनामध्ये कंम्बोडिया, लाओस व व्हिएतनाम या तिनही देशावर रामायणाचा गहिरा प्रभाव आहे, कंम्बोडियामध्ये रामायणाला 'रीमकर' असे म्हटले जाते. अँकोर वॉट या प्राचीन मंदिरामध्ये अनेक रामायणातील प्रसंग रेखाटण्यात आले आहेत. आता इन्डोनेशियात सुद्धा रामायण लोकसंस्कृतिमध्ये जिवंत आहे. तेथील लोक अभिमानाने रामायणातील नावे धारण करतात. व्हिएतनामध्ये सुद्धा रामायणाचा प्रभाव दिसतो. लाओ रामायण हे लाओस मध्ये लोकप्रिय आहे. ब्रह्मदेशात सुद्धा रामायण कथेचा प्रभाव दिसतो. मालदिव बेटावर रामायणातील प्रसंगाच्या आधारे मालदिवीयन रामायण सादर केले जाते. कंम्बोडियन तसेच व्हिएतनामी रामायणाच्या आवृत्या अद्‌भूत स्थानिक छटा प्रकट करतात. मलेशियातील रामायणास'मलय' रामायण असे म्हटले जाते. भारतीय सांस्कृतिक परिषदेच्या वतीने गेल्या तीन वर्षापासून आंतरराष्ट्रीय राम कथा उत्सव साजरा केला जात आहे. डॉ. विनय सहश्रबुद्धे यांचा हा उपक्रम नवी कलाटणी देणारा ठरला आहे. श्रीलंका व नेपाळी रामायणाच्या विविध आवृत्त्या अभ्यास करण्यासारख्या आहेत. तिबेटी चीनी रामायणावर बौद्ध संस्कृतिचा प्रभाव जाणवतो तर मलय रामायणावर मलेशियातील भारतीय संस्कृतिची छाप प्रकट होते. आग्नेय आशियातील रामायण कथा आणि मुर्ती विज्ञानाचा संबंध अनेक संशोधकांनी तपासला आहे.

**रामायण नवे संदर्भ :** रामायणातील नवे पुरातत्त्वीय संदर्भ व लोककथातील संदर्भ यांच्यातील सुंदर समन्वय साध्यण्याची गरज आहे. कारण प्रत्यक्ष रामायणातील अनेक उपेक्षित दुवे भक्कम पणे जोडण्याचे कार्य लोककथांच्या माध्यमातून साध्य केले जाऊ शकते. रामायण हा शब्द राम आणि अयन या दोन शब्दांनी बनला आहे. राम हा केवळ रामायणाचा नायक नाही तर भारतीय लोकजीवनातील महानायक आहे. अथर्व वेदामध्ये राम शब्दाचा अर्थ गडद रंगाचा काळा असा दिला आहे तर महाभारतामध्ये आलेल्या संदर्भानुसार आनंददायक, मोहक, सुंदर असा दिला आहे. मौल स्वर्थ कोषात म्हटल्याप्रमाणेशांत स्थिर आणि प्रसन्न रहा असा त्यांचा संदेश आहे. रामायण म्हणजे रामाचा प्रवास प्रभू रामचंद्राने उत्तर ते दक्षिण असा जो वनवास काळात प्रवास केला त्याचे चित्रण रामायणात येते. भूतकाळातील घटनांचे वर्णन म्हणजे पुरावृत्त हा रामायणाचा आत्मा आहे. आदर्श मानवी जीवन तसेच तात्त्विक व सात्त्विक जीवनाचे पैलू त्यातून हळुवार उलगडले आहेत. राजा व राजांची कर्तव्ये, ऋषी मुनींची शिकवण, राजा व प्रजा यातील संबंध, नैतिक मुल्याची शिकवण हे पैलू अत्यंत महत्त्वाचे आहेत. रामायणातील प्रसंग, कालावधी आणि कथाभारतीय संस्कृतीचे अनेक पैलू उलगडत जातात. रॉबर्ट गोल्डमन यांच्या मते, रामायण मानवी मुल्यांची खाण आहे. रामायणातील सर्वात जूना भाग सातव्या शतकाच्या पूर्वाधातील आहे. रामायणातील कथानक सात अध्यायात रचले आहे. त्यापैकी बालकांड व उत्तर कांड हे नंतर जोडले असावेत. अन्य पाच अध्यायावरवाल्मिकीं ऋषींच्या भाषा शैलीचा अमिट ठसा दिसतो. प्रा. बी.बी. लाल यांच्या पुढाकारमुळे उत्तर भारतातील रामायण स्थळांचा अभ्यास बराच झाला आहे परंतु दक्षिण भारत मात्र अजून उलगडावयाचा आहे. पुरातत्त्व आणि लोकतत्त्व यांचा एकत्र अभ्यास केला असता अनेक नवीन तथ्य प्रकाशात येऊ शकतात. बालकांड व अयोध्या कांड यापेक्षा अरण्य कांडाचा अभ्यास लोककथा व लोकपुरातत्त्वाच्या आधारे करावा लागणार आहे. किष्कींधा कांड हा भाग सुद्धा नव्याने अभ्यासण्याची गरज आहे. सुंदर कांड हे वाल्मिकी रामायणाचे ह्दय स्थान आहे. श्रीलंकेतील प्रवेशापासून रावणाच्या पराभवापर्यंत आणि युद्ध कांडातील घटनाचक्राचे नव्याने विश्लेषण करावे लागेल. रामायण कथांचे परिपुर्ण आणि समाधानी विश्लेषण करण्यासाठी नव समाजशास्त्रीय दृष्टीने आकलन करावे लागेल. रामायणाच्या प्रादेशिक स्थानिक सामुग्रीचे महत्त्व तेवढेच आहे. तामिळनाडूतील कंब रामायणम्, गोनाबीड्डु रेड्डी यांनी तेलगूमध्ये लिहिले रंगनाथ रामायण याचेही महत्त्व तेवढेच आहे. बंगाली ओडिया भाषातील रामायणांचाही अभ्यास आवश्यक आहे.

**लोकशैली व लोकसंस्कृती :** जनमनातील रामायणाचा अभ्यास करतांना लोकशैली व लोकसंस्कृती यांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. बौद्ध, जैन व शिख रामायणातील मुल्य प्रेरणा राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक आहेत. शैलीचा विचार करता असे दिसते की, आजवरची प्रमुख तेरा भाष्य उपलब्ध आहेत. या भाषातून तिलक भूषण आणि शिरोमणी हे तीन भाष्यकार त्रिकूट म्हणून ओळखले जातात. रामायणाच्या प्रभावाचा विचार करता असे दिसते की, अग्नेय आशियामध्ये प्राचीन काळापासून चौदाव्या शतकापर्यंत रामायण हा आदर्श जीवन प्रवाह होता. कोडेज यांनी लिहीलेल्या ग्रंथामध्ये त्यांनी कला स्थापत्य व साहित्य शिल्प कला याच्या प्रभावाचा विचार करता भारतीयकरण ही संकल्पना मांडली आहे. अनेक अग्नेय आशियाई देशांचे रामायणामुळे भारतीयकरण घडून आले आहे. रामायणाने उत्तर दक्षिण भारतातील संस्कृतीचा सेतू जोडला तसेच भारताचे राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित केले आहे. रामायणाच्या सांस्कृतीक प्रभावाची चिन्हे तीस छोट्या मोठ्या आग्नेय आशियाई देशामध्ये दिसून येतात. नाट्य, कादंबरी, चित्रपट, दुरदर्शन इत्यादी माध्यमातून सुद्धा रामायण लोकमाणसांत जिवंत राहीले आहे. चक्रवर्ती राजगोपालाचारी व साहित्यिक आर. के. नारायण यानीही रामायण अमर केले आहे.

**समारोप :** अशा प्रकारे अयोध्येतील प्रभू रामचंद्राप्रमाणे जनमनातील प्रभू रामाचे स्थान अभ्यासणे महत्त्वाचे आहे, कारण रामायणाचा भारतीय लोकजीवनावर विलक्षण प्रभाव आहे. लोकजीवनातील व लोक संस्कृतीमध्ये रामाचा प्रभाव हा लोककथांच्या शैली, रचना व अभिव्यक्तीच्या माध्यमातून अधिक जाणवतो लोककथामधील प्रसंग हे पुरातत्त्वीय आणि वाङमयीन साधनांच्या आधारे अभ्यासले पाहिजेत. आपले राज्य कसे चालवावे या बाबतीत दुसऱ्या अध्यायात भरताने विचारलेल्या प्रश्नांना रामाने दिलेली उत्तरे ही कुशल लोक प्रशासनासाठी पथदर्शक आहेत. त्यामुळे श्रीरामाला अधुनिक लोकशाहीचा महानायक म्हटले जाते. महात्मा गांधीनी रामराज्य संकल्पनेचा विकास केला. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रत्यक्षात रामराज्य कृतीमध्ये आणत आहेत. त्यांची विकास संकल्प यात्रा म्हणजे राम कथेचा नवा प्रवास आहे. जनमनातील श्रीराम ओळखल्याशिवाय लोक कल्याणकारी राज्य कृतीमध्ये येऊ शकत नाही हे ओळखून स्वामी विवेकानंदाचा संदेश कृतीमध्ये आणला पाहीजे.दुःखी असलेला सामान्य माणूस समाधानी करणे हाच रामकथेचा संदेश होय. बहुजनातील राम ओळखावा कारण विवेकानंद म्हणतात मी त्या इश्वराचा भक्त आहे ज्याला लोक सामान्य माणूस म्हणतात. हाच जनमनातील श्रीरामांचा संदेश आहे.

# आचरणात रामत्व प्रकट झाले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपलं दैनंदिन जीवनातील आचरण हे प्रभु श्रीराम यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून झालं तर निश्चितच आपल जीवन राम मय झाल्याशिवाय राहणार नाही.प्रभु श्रीराम हे खरया अर्थाने आपल्या जीवनात स्थापित झाले पाहिजेत वास्तविक राम नामाचा उत्सव साजरा करून आपलं जीवन राम मय व्हव म्हणून निसर्गाने मानव स्वरूपात आपल्याला जन्म घेण्याची संधी बहाल केली आहे.पण दुर्दैवाने आपल्या जीवनात राम नाम नसल्याने आचरणत राम तत्त्व प्रकट होत नाही हे आपलं दुर्भाग्य म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. सृष्टीवर निर्माण होणाऱ्या अनेक पिढ्यांना जीवन पथ मार्गावरील आदर्श परंपरा निर्माण करण्यासाठी प्रभु श्रीराम यांनी अवातार धारण केला आणि मानव स्वरूपात जीवन जगताना अनेक असे आदर्श स्थापित केले.**

त्यापैकी एक आदर्श जरी आपण आचरणत आणला तर आपलं जीवन राममय होईल.

राम नामाचा महिमा आपण ऐकून आहेत लंकेत जाण्यासाठी समुद्रात सेतू निर्माण करत असताना प्रभु श्रीराम यांच्या नावाने साक्षात दगड तरले आणि सेतू यशस्वी निर्माण झाला.दगड तरू शकतो तर राम नामाने मानवाचं किती मोठं हित साध्य होईल याच साक्षात प्रमाण वाल्या कोळी नावाचा कुख्यात गुंड लुटेरा देखील राम नामाने वाल्मिक ऋषी झाला. राम नामाचा प्रभाव हा सृष्टीवर तर प्रभावी आहेच पण श्री भगवान शिव शंकर हे देखील प्रभु श्रीराम यांना आपलं आराध्य दैवत मानून भगवान शंकर हे ध्यानस्थ असताना राम नामाचा मंत्र जाप करतात एवढी प्रचंड महती राम नामाची असून प्रभु श्रीराम यांच जीवन चरित्र हे आदर्श पथ आणि त्यागाचे प्रतिक आहे.सृष्टी वर आदर्श स्थापित करत असताना न्याय निती धर्म सदाचार यांचा वस्तू पाठ सृष्टी वरील अनेक पिढ्या साठी दिशादर्शक ठरेल अशा पद्धतीने आदर्श स्थापित करणारे प्रभु श्रीराम आदर्शत्वाचा महामेरू होते. हेच तत्व हेच गुण आपण आपल्या जीवनात अंगिकारले पाहिजेत. राक्षसांचा राज रावणा याने झळ कपट करून माता सीता यांच हरण केल.माता सीता यांच्या शोधार्थ निघालेल्या प्रभु श्रीराम यांनी मार्गात भेटलेल्या दुःखीत सुग्रीव यांच्याशी मैत्री करून त्याला किष्किंधेचा राजा करण्याचं अभिवाचन दिलं आणि ते पाळल. त्या वेळी बलाढ्य अशा वालीची मदत न घेता दुर्बल सुग्रीव याला सोबत घेतलं वालीचा वध केला आणि सुग्रीव याला किष्किंधा राज्य देऊन सोबत घेतलं वास्तविक वालीने रावणाला काखेत घेऊन समुद्र भ्रमण केले होत.एकटा वाली देखील रावणाला पराभूत करू शकत होता पण त्याचा दृष्टीकोन योग्य नितीसंगत नव्हता म्हणून त्याला सोबत घेतलं नाही तर दंडीत केल.आणि किष्किंधा राज्य जिंकल्यावर ते अयोध्या राज्याला न जोडता ते थेट सुग्रीव याला बहाल केलं त्याचं पद्धतीने लंकेच राज्य जिंकल्यावर बिभीषणाला दिल. आपण सर्वांचे आराध्य दैवत प्रभु श्रीराम यांच नाम हेच उत्सव असून हाच उत्सव यशस्वीपणे साजरा करण्यासाठी आपलं जीवन आहे.एवढ जरी समजलं तरी हा जन्म व्यवस्थित पुर्णत्वास जाण्यासाठी पुरेसं आहे.मर्यादा पुरूषोत्तम असणारे



प्रभू रामचंद्र हे मानवी जीवनाशी निगडित प्रत्येक कर्तव्य आणि जबाबदारी निर्वाहण करत असताना कर्माला न्याय निती धर्म हाच साक्षीदार असला पाहिजे.संघर्षाची मालिका आणि त्यामधून निर्माण झालेला आदर्शाचा पथ दर्शक मार्ग हि प्रभु श्रीराम यांच्या जीवनाची यशोगाथा आहे.अगदी बाल वयात शिक्षण घेण्यासाठी गुरूच्या अश्रामात जाऊन तिथं निवासी राहिले आणि राजपुत्र असून देखील सर्व सामान्य माणसाच्या मुला सारखे जमिनीवर विश्राम केला.वास्तविक प्रभु श्रीराम हे राजवाड्यात देखील गुरूला शिक्षण साठी बोलवू शकले असते पण असं केलं नाही.राम हे राम आहेत अगदी समुद्र सारखे विशाल शांत संयमी आज संध्याकाळी समजलं राज्य मिळणार राजा होणार आनंद नाही आणि सकाळी समजलं राज्य नाही चौदा वर्षे वनावास आहे याच दुःख नाही राज्य मिळणार म्हणून आनंद नाही आणि वनवास आला महणून दुःख नाही. आपल्या सावत्र आईच्या मनात विकल्प निर्माण झाला आणि तो विकल्प वडीलांच्या समोर मांडल्या नंतर वडील धर्म संकटात सापडले वडीलांची या संकटातून सुटका व्हावी म्हणून वनगमन करण्यासाठी निघालेल प्रभु श्रीराम अयोध्य सोडून जाताच वडील दशरथ यांचं वैकुंठ गमन झालं. वडीलांच्या वैकुंठ गमनानंतर बंधु भरत आणि सर्व मंत्री गण या सह तीनही माता आणि अयोध्या नगरीची प्रजा या सर्वांनी येऊन भेट घेतली राजा दशरथ यांच्या वैकुंठ गमनानंतर उर्वरित सर्व विधी पुर्ण केले.या वेळी प्रभु श्रीराम यांनी सगळ्यात जास्त काळाजी आस्थेवाईकपणे चौकशी माता कयकाई यांची केली. त्यांच्या शब्दामुळे वनावास मिळाला हे जगजाहीर असताना देखील आपुलकी कायम ठेवणं म्हणजे उदात्त अंतःकरण.विधी पुर्ण झाल्यावर त्याच दिवशी संध्याकाळी बैठक झाली सर्वांनी विनंती केली कि आपण परत चालावं पण प्रभु श्रीराम यांनी सांगितल बहुमत असल तरी निती सोडून आचरण करण योग्य नाही वडील हयात नाहीत म्हणून त्यांच्या पश्चात शब्द पाळायचा नाही हा धर्म नाही म्हणून मी चौदा वर्षे वनावास पुर्ण करूनच अयोध्या नगरीत परत येईल. आचरणात रामत्व निर्माण झाल्याशिवाय खरे राम कळणार नाहीत म्हणून खरे राम समजण्यासाठी आचरणत रामत्व प्रकट झाल पाहिजे.

# धुळे महानगरी सजली रंगीबेरंगी दिव्यांनी

## अनुप अग्रवालांनी साकारली शहरात प्रतिअयोध्या

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** संपूर्ण हिंदुस्थान सध्या



प्रभूरामचंद्राच्या भक्तीमय वातावरणात तल्लीन होत आहे. सर्वत्र रामललांच्या भव्य दिव्य मंदिराची चर्चा सुरु आहे. आयोध्या नगरीत एकच जल्लोष संचारला आहे प्रत्येकांची मी केव्हा आयोध्याला जाईल व प्रभू रामचंद्राचे दर्शन घेईल ही अवस्था झाली असतांना नेमके हिच गोष्ट धुळ्यातील सनातन धर्मासाठी अग्रसेर असणारे प्रभू श्री रामभक्त यांनी हेरली व आयोध्येतील राम मंदिराची प्रतीकृती या शहरात साकारली. या निमित्ताने सर्व भक्तांची रामभक्तांच्या दर्शनाची व्याकुळता काही प्रमाणात येथेच पूर्ण होणार आहे. राम मंदिराची प्रतिकृती साकारत संपूर्ण शहर “माझे शहर माझी आयोध्या” ही संकल्पना साकारत नगावबारी पासून थेट गुरुद्वारा पर्यंत, मार्केट यार्ड परिसर, ८० फुटी रोड, संतोषी माता परिसर स्टेशन रोड परिसर, नदीकाठचा परिसरासह शहरात सर्वत्र विविध रंगी रोषणाईने तसेच रंगीबिरंगी बलून वेगवेगळ्या झाडांवर लावून जणू दिवाळीचेच वातावरण संपूर्ण शहरात यानिमित्ताने अग्रवालांनी निर्माण केले आहे. तसेच या निमित्ताने १० दिवस विविध भक्तीमय मनोरंजनाचे कार्यक्रमही अयोजीत केले आहेत. या कार्यक्रमांना उपस्थितीचे आवाहन श्री राम भक्त अनुप अग्रवालांनी केले आहे.

या प्रतिकृतीची चर्चा शहरात नव्हे तर संपूर्ण महाराष्टात सुरु आहे व धुळे शहरात साक्षात आयोध्या नगरी अवतरण्याच्या बातमीने भाजप अध्यक्ष बावनकुळेनाही येथे येण्याचा मोह आवरता आला नाही व त्यांनी चाळीसगांव दौऱ्यातच धुळे येथे भेटीचे नियोजन करीत इथे भेट देऊन अग्रवालांनी पाठ थोपटत कौतुक केले.

प्रभू रामचंद्रांच्या मंदीर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त धुळे शहरात अनुप अग्रवालांनी भव्य अशा शोभायात्रेचे आयोजन केले असून विविध पथके, नृत्यपथक, ढोलपथक, देखावे यांचा यात समावेश आहे. ही शोभा यात्रा छत्रपती शिवाजी महाराज स्मारका - गांधी स्मारक – श्री स्वामी समर्थ मंदिर मार्गे – पांझरा नदी किनारी - आयोध्या नगरी पर्यंत असणार आहे. तरी सर्व रामभक्तांनी मोठ्या संख्येने यात सहभागी होण्याचे आवाहन अनुप अग्रवालांनी केले आहे.

# फुलंब्रीत अवैध धंदे जोरात

## झन्ना मन्ना- पत्यांचे क्लब बिनधास्त चालू

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** पोलीस ठाण्याच्या हद्दीतील स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने अनेक दिवसांपासून बेधडक पणे मोठ्या प्रमाणात अवैध धंदे व जुगार अड्डे सुरू आहे. यामध्ये अवैध धंदे वाल्यांकडुन पोलीस अधिकार्यांच्या नावाखाली संबंधित विभागाच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी च्या मिलीभगतने फुलंब्री शहरात ऑनलाइन मटका ऑनलाइन चक्री, ऑनलाइन लॉटरी कल्याण मुंबई मटका ऑनलाइन झन्ना मन्ना पत्यांचे क्लब काळा पिवळा अवैध देशी विदेशी दारू अशा विविध प्रकारचे जुगार अड्डे फुलंब्री शहरातील बाजारगल्ली मध्ये आठ ते दहा दुकाने थाटलेली आहे. फुलंब्री चा बसस्थानक, फुलंब्री टी पॉइंट, औरंगाबाद जळगाव महामार्गावरील दुकाने थाटली आहेत. ही सर्व दुकाने स्थानिक पोलीस अधिकार्यांच्या अशीर्वादाने सुरू आहे. फुलंब्री शहरात भुरटे चोर वाढले आहे त्या कडे दुर्लक्ष करत आहे. या संबंधित कारभाराकडे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देत फुलंब्री शहरातील अवैध धंदे बंद करा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# लोहा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** २२ जानेवारी रोजी आयोध्येत प्रभु श्रीराम मंदिर व श्रीराम मुर्ती प्राणप्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे.



त्यानिमित्ताने लोह्यातील श्रीराम मंदिर शिक्षक कॉलनी येथे दि.(२१) जानेवारी व दि.(२२) जानेवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले असून आयोजित कार्यक्रमाला भाविक भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिर समितीचे अध्यक्ष तथा भाजपचे नगरसेवक भास्कर पाटील पवार यांनी केले आहे. श्रीराम मंदिर शिक्षक कॉलनी लोहा येथे दि.(२१) जानेवारी व दि.(२२) जानेवारी रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.तत्पुर्वी संपुर्ण मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे.सदरील धार्मिक कार्यक्रमांमध्ये दि.(२१) जानेवारी रोजी सायंकाळी ७.०० वाजता भव्य दिपोत्सव व दि.(२२) जानेवारी रोजी सकाळी ७.०० वाजता भव्य दिपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.०० वाजता भव्य कलश यात्रा ,११.०० वाजता रांगोळी स्पर्धा,१२.३० वाजता महाआरती ,१.०० वाजता खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निधीतून श्रीराम मंदिर संरक्षण भिंत बांधकाम निधी दिला त्याच भुमिपूजन हे युवा नेते प्रविण पाटील चिखलीकर यांच्या शुभहस्ते झाल्यानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील वरील कार्यक्रमाला शहर परिसरातील श्रीराम भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षक कॉलनी येथील श्रीराम मंदिर समितीचे अध्यक्ष नगरसेवक भास्कर पाटील पवार व सर्व सन्माननीय पदाधिकारी सदस्य यांनी केले आहे.

# रिसोड तालुक्यात वन्य प्राण्यांच्या हैदोसाने शेतकरी त्रस्त

## गहु, हरभरा रब्बी पिक होत आहेत फस्त; वन विभागासह लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** तालुक्यात नोव्हेंबर मध्ये आलेल्या अवकाळी पावसाने रब्बीतील मुख्य पीक असलेल्या तूर पिकाचे मोठया प्रमाणात नुसकान होऊन तूर पीक हातचे गेले. तसेच हरबरा या पिकाच्या शेतक-यावर दुबार पेरणीचं संकट ओढवले त्यातुन कसे बसे गहु हरभरा पिक सावरले त्यात रोही, हरीण, रान डुक्कर या वन्य प्राण्याच्या हैदोसामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे शेतक-यांना रात्रदिवस खडा पाहरा द्यावा लागत आहे. या परिसरातील शेतकऱ्यांनी वनविभागाला वारंवार तक्रार देऊन ही दखल घेतली जात नाही आसा आरोप शेतक-यामधुन होत आहे. दिवसेंदिवस मेहनत करुन उभे केलेले पिक डोळ्यांच्या देखत जमीनदोस्त होत आहेत. त्यामुळे ईथला शेतकरी अर्थिक,मानसिक संकटात सापडला आहे. लोणी शेत शिवारात वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात हैदोस वाढल्याने महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री सुधीर मुनगंटीवार हे लोणी बू येथे संत सखाराम महाराज यांच्या दर्शनासाठी आले आसता परिसरातील लोणी बू ,लोणी खुर्द ग्राम पंचायत ने वन विभागाला कुंपण करण्यासाठी ग्राम सभेचे ठराव ही दिले तसेच मंत्री महोदयांनी जिल्हा वन अधिकाऱ्यांना आराखडा तयार करून प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आदेश ही दिले परंतु अद्याप पर्यंत वन विभागाने कोणत्याही हालचाली केल्या नसल्याने बोलल्या जात



वाशिम जिल्ह्यातील वन परिक्षेत्राला वन्य प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी तार कंपाऊंड करण्या बाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्याचे वन मंत्री लोणी सम येथे दर्शनासाठी आले असता त्यांनी जिल्हा वन विभागाच्या अधिकाऱ्यांना संपूर्ण वन परिसराला तार कंपाऊंड करण्या बाबतचा प्रस्ताव शासनाला तात्काळ सादर करण्या बाबत सांगितले त्या नुसार वाशिम वन विभागाने तसा प्रस्ताव तयार करून सन 2023 अखेरीस शासनास सादर केला आहे . येत्या दोन तीन महिन्यात मंजुरात येण्याची शक्यता असून शासनाचे आदेश येताच सर्व वन विभागाला तार कंपाऊंड करण्यात येणार आहे . **अभिजित वायकोस जिल्हा उपवन अधिकारी वाशिम**

वन्यप्राणी रोही, हरीण, रान डुक्कर आदी वन्य प्राण्याचा लोणी बू सह परिसरातील सर्वच शेतकऱ्यांना वन्य प्राण्याचा त्रास सहन करावा लागत आहे . एवढेच नाही तर रात्रंदिवस खडा पहारा करून पिकांचे रक्षण करावे लागत असून एखाद्या वेळेस जर थोडा डोळा जरी लागला तरी पूर्ण पीक होत्याच नव्हत होत .तसेच वन्य प्राण्यांनी अनेक वेळा शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला झाल्याच्या घटना देखील घडल्या आहेत . वन विभागाने तात्काळ वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा .
**सदाशिव मिटकरी शेतकरी लोणी बू**

आहे. परिसरातील वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षणासाठी दमछाक होताना दिसून येत आहे. परंतु वन विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून संताप व्यक्त केला जात असून वन्य प्राण्यांचा वन विभागाने तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

# जय श्रीराम शेतकरी सहकार विकास पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ

## राज्याचे अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार मंत्री यांच्या नेतृत्वात निवडणुकीस प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कृषी उत्पन्न बाजार समिती सिल्लोड, सोयगाव निवडणूक सन २०२४ शिवसेना शिंदे गटाचे जय श्रीराम शेतकरी सहकार विकास पॅनल चे चिन्ह "कपबशी"चे अधिकृत उमेदवार दारासिंग बंडू चव्हाण यांच्या पॅनल प्रचाराचा आज दि.२०/१/२४ रोजी सावळदबारा येथे भगवान श्रीचक्रधर स्वामी मंदिर येथे मोठ्या थाटामाटात प्रचाराचा मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून शुभारंभ करण्यात आला.येथील चक्रधर स्वामी मंदिर परिसरातील पुतळ्याला अभिवादन करून "कपबशी" या चिन्हांचा प्रचाराचा नारळ फोडण्यात आले.



सिल्लोड - सोयगाव बाजार समिती निवडणुकीत जय श्रीराम शेतकरी सहकार विकास पॅनल चे अधिकृत उमेदवार चव्हाण दारासिंग बंडू ग्रामपंचायत मतदार संघ सर्वसाधारण नांदा तांडा, प्रभाकर काळे सहकारी संस्था सर्वसाधारण,गव्हाणे दामोधर सहकारी संस्था सर्वसाधारण,चिंचपुरे जयराम सहकारी संस्था सर्वसाधारण,तायडे केशवराव सहकारी संस्था सर्वसाधारण,पाटणी सुनील सहकारी संस्था सर्वसाधारण, शिंदे अरुण सहकारी संस्था सर्वसाधारण,साळवे श्रीरंग सहकारी संस्था सर्वसाधारण,मोरे अनुसया सहकारी संस्था सर्वसाधारण, रहाटे शालीनी सहकारी संस्था सर्वसाधारण,ताठे सतीश भटक्या विमुक्त जाती/ जमाती, दाभाडे विश्वास ग्रामपंचायत मतदार संघ सर्वसाधारण, राऊत संदीप ग्रामपंचायत मतदार संघ आर्थिक दुबळ घटक,पाडळे राजाराम अनुसूचित जाती/जमाती,लाठी रमेश व्यापारी मतदार संघ, लोखंडे भावराव व्यापारी मतदार संघ,शेख जावेद शे.जहीर हमाल तोलारी मतदार संघ सहारे नंदकिशोर इतर मागास प्रवर्ग, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मतदान दि.२८/१/२४ रविवार रोजी मतदान वेळ सकाळी ८ ते ४ पर्यंत राहील शुभारंभ प्रसंगी माजी सभापती शिवाप्पा चोपडे , मो लुखमान मो शरीफ,रामभाऊ वारंगणे, सरपंच सुरेश चव्हाण, सरपंच भागवत जाधव, राहुल हेलोडे, दिनकरराव देशमुख, सभापती धरमसिंग चव्हाण,मोहन सुरडकर,नंदू सुरडकर, पंडित सरपंच सतीश सावंत सांडू तडवी हिरा जाधव मेघराज कनीराम जाधव चव्हाण मेघराज जाधव गंगाधर सदाशिव गुलाब टेलर,गुलाबसिंग राणा, गणेश खैरे, योगेश चोपडे,व परिसरातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सोसायटी चेअरमन व्हा. चेअरमन सोसायटी सदस्य पदाधिकारी डाभा,देव्हारी, टिटवी, पळसखेडा मोलखेडा घाणेगांव तांडा, पिंपळवाडी, चारुतांडा, नांदा तांडा, नादागाव, महाल्बदा, हिवरी व सावळदबारा यांच्यासह हमाल मापाडी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी निवडणूक रिंगणात असलेले शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहन सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.






रामलीला सादर करताना लहान मुले. छायाचित्र : शेख यासीन, लोणार

# पिंपळवाडीत श्रीराम मंदिर उद्घाटन

## गावात मटन, चिकन व दारूबंदीचा घेतला ठराव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पिंपळवाडी,महिल्बदा गावात अयोध्या येथे श्रीराम मंदिर उद्घाटन मोठा सोहळा दि.२२ जानेवारी २०२४ ला संपन्न होत आहे.या निमित्ताने मटन, चिकन,मच्छी व दारु कोणी विकणार नाही याची खबरदारी घ्यावी असे आवाहन सरपंच वंदना सतीश सावंत यांनी केले आहे विकल्यास त्यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशा गंभीर इशारा उपसरपंच यांनी दिला आहे. ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभा बोलावून गाव व परिसरात यापुढे थेंबभरदेखील दारू विकली जाणार नाही, असा दारूबंदीचा ठराव मंजूर केला आहे. आषाढी वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांनीही ग्रामसभेत सहभाग घेऊन दारूबंदी ठरावाला पूर्ण पाठिंबा



दिला. यावेळी महिला वर्गाने मटन, चिकन, मच्छी व दारूबंदीचा ठराव मांडला. या ठरावावर ग्रामसभेत सविस्तर चर्चा होऊन एकमुखाने दारूबंदीचा ठराव मंजूर करण्यात आला. असे सरपंच शिवगंगा शिवाआप्पा चोपडे यांनी जाहीर केले. यावेळी ग्रामसेवक एन जी गोरे, मंगला आळेकर,तानाजी सोनुले, प्रियांका बंन्डे,आशा जाधव,सुरेखा खरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, महिला, युवक, वारकरी उपस्थित होते.
सर्व मटण, चिकन, मच्छी व चायनीज विक्रेत्यांना तसेच मांसाहारी हॉटेल व धाबा मालकांना कळविण्यात येते कि, श्री क्षेत्र अयोध्या धाम येथे श्री राम मूर्ती प्राणप्रतिष्ठा उत्सव सोमवार दि.२२/०१/२०२४ रोजी होणार असून आपल्या गावामध्ये श्रीराम मंदिर येथे मोठा उत्सव साजरा होणार आहे.
तरी गावात कोणत्याही प्रकारचे मटण, चिकन व मच्छी तसेच देशी व विदेशी मद्य (दारू) विक्री करण्यासाठी बंदी केली आहे.आपण आपली मटण, चिकन, मच्छी विक्री दुकाने, चायनीज दुकाने, मासांहारी हॉटेल अथवा धाबा मद्य (दारू) दुकाने मालकांनी कोणत्याही प्रकारे सुरु न ठेवता संपूर्ण बंद ठेवावी. सर्व विक्रेत्यांनी दुकान धारकांनी ह्या सूचनेची दखल घेवून श्री राम उत्सव व ग्रा.प.ला सहकार्य करावे.असे आवाहन देखील सरपंचपती सतीश सावंत यांनी केले आहे.

# वडोद बाजार येथील मंदिरांची साफसफाई

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** सोमवार रोजी श्री क्षेत्र अयोध्या धाम येथे श्रीराम मूर्ती प्राण प्रतिष्ठा उत्सव होणार असून या निमित्त वडोद बाजार येथील मंदिराची स्वच्छता करण्यात आली उपसरपंच गोपाळ वाघ यांनी गावकऱ्यांनी वडोद बाजार येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिराची स्वच्छता केली श्रीक्षेत्र अयोध्या धाम येथे श्रीराम मूर्ती प्राण प्रतिष्ठा उत्सव वार सोमवार दिनांकः 22/ रोजी होणार असून अशा भव्य व दिव्य वातावरणाच्या दिवशी तसेच दि. 20 ते 22 जानेवारीपर्यंत आपल्या गावातील धार्मिक स्थळे स्वच्छ व सुंदर ठेवणे. आपल्या घरासमोरील परिसर स्वच्छ ठेउन सडा रांगोळी करून पूजा पाठ करणे जेणे करून आपले गाव व आपला परिसर स्वच्छ राहील असे भाविक व धार्मिक कामे करण्याचे आवाहन ग्रामपंचायत कडून करण्यात आले आहे.



# दिवाळीप्रमाणे श्रीराम मंदिर उत्सव साजरा करा : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीराम जन्मोत्सव



अयोध्या येथे आज २२ जानेवारी या दिवस श्रीराममूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या निमित्ताने दीपोत्सव साजरा करा असे आवाहन प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे भारतासह विश्वभरामध्ये धर्माधिष्ठित रामराज्य आणण्यासाठी भगवान प्रभु श्रीरामाचे आगमन होत आहे !प्रभू श्रीरामचंद्रा मुळे भारतीयांना एका वर्षात दुसऱ्यांदा दिवाळी साजरी करण्याची संधी प्राप्त हिंदूंसाठी अयोध्येचे वेगळे महत्त्व आहे. ती राजा दशरथाची नगरी आणि रामललाचे जन्मस्थान आहे. प्रभू श्रीराम एक आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श भ्राता, आदर्श राजा आणि श्रीविष्णूचा ७ वा अवतार होता. कुठे आदर्श असे राज्य किंवा व्यवस्था असेल, तर त्याला 'रामराज्य' असे म्हटले जाते. असा नावलौकिक राजा प्रभू श्रीराम यांनी मिळवला होता. अयोध्या हे हिंदूंप्रमाणे जैन आणि बौद्ध यांचेही श्रद्धास्थान आहे. जैनांच्या २४ तीर्थंकरांपैकी ५ तीर्थंकर अयोध्येचे आहेत, तर गौतम बुद्ध यांनी येथे काही दिवस साधना केली आहे. त्यामुळे अयोध्या हे जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र ठरले आहे. अशा अयोध्येत २२ जानेवारीला प्रभू श्रीरामललाची प्राणप्रतिष्ठापना होत आहे. त्या निमित्ताने संपूर्ण भारतभर त्याची सिद्धता चालू आहे. प्रचंड उत्साह जनतेमध्ये दिसून येत आहे. यानिमित्ताने हिंदू एकाच वर्षात दुसऱ्यांदा दिवाळी साजरी करत आहेत. गेली काही आठवडे सर्व देश आणि हिंदू भगवामय झाल्याचे दिसत आहेत. दूरचित्रवाहिन्या, सामाजिक माध्यमे, वर्तमानपत्रे, सामाजिक माध्यमे यांमध्ये केवळ प्रभु श्रीराम हाच विषय चालू आहे. त्यामुळे आपण भारताचे नागरिक म्हणून आपल्या प्रत्येक घरावरती ओम श्री रामचंद्रांचा भगवा ध्वज उभारून शौर्य त्याग बलिदान व विजयाची गुढी उभारावी प्रत्येकाने आपल्या घरासमोर सडा रांगोळी काढून तोरण उभरावे तसेच आपल्या घरामध्ये दीपोत्सव साजरा करावा परिवारातील प्रत्येक सदस्याला परिवारातील सर्व पशुना गोडपंचपकावान खायला द्यावे घरातील प्रत्येक सदस्यांनी श्रीरामचंद्राचा प्रतिमेचे पूजन करावे त्यांचा आदर्श घरातील प्रत्येक सदस्यांना लहान थोर मंडळींना सांगावा एक आदर्श व्यक्तिमत्व कसे असते लाखो वर्षानंतर सुद्धा इतिहास रचला जाऊ शकतो त्यासाठी आपले कर्म आपली निस्वार्थवृत्ती व आपलं चरित्र माणसांनी कसे जपावे याचे जगातील एकमेव उदाहरण म्हणजे प्रभू श्रीरामचंद्र आदर्श कुटुंबातील प्रत्येक सदस्यांना सांगावा. आपल्या धर्माची संस्कृती आपल्या धर्मातील श्रद्धा आपल्या धर्माचें प्रतीके याचे जतन प्रत्येकाने करावे.असे आवाहन प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा ता सोयगाव यांनी केले आहे.

# 'न भूतो न भविष्यति' असा प्राणप्रतिष्ठा सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीराम जन्मोत्सव अयोध्या येथे आज २२ जानेवारी या दिवस श्रीराममूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या निमित्ताने दीपोत्सव साजरा करा असे आवाहन जिल्हा सरचिटणीस उत्तम चव्हाण देव्हारी यांनी केले आहे. भारतासह विश्वभरामध्ये धर्माधिष्ठित रामराज्य आणण्यासाठी भगवान प्रभु श्रीरामाचे आगमन होत आहे !प्रभू श्रीरामचंद्रा मुळे भारतीयांना एका वर्षात दुसऱ्यांदा दिवाळी साजरी करण्याची संधी प्राप्त हिंदूंसाठी अयोध्येचे वेगळे महत्त्व आहे. ती राजा दशरथाची नगरी आणि रामललाचे जन्मस्थान आहे. प्रभू श्रीराम एक आदर्श पुत्र, आदर्श पती, आदर्श भ्राता, आदर्श राजा आणि श्रीविष्णूचा ७ वा अवतार होता. कुठे आदर्श असे राज्य किंवा व्यवस्था असेल, तर त्याला 'रामराज्य' असे म्हटले जाते. असा नावलौकिक राजा प्रभू श्रीराम यांनी मिळवला होता. अयोध्या हे हिंदूंप्रमाणे जैन आणि बौद्ध यांचेही श्रद्धास्थान आहे. जैनांच्या २४ तीर्थंकरांपैकी ५ तीर्थंकर अयोध्येचे आहेत, तर गौतम बुद्ध यांनी येथे काही दिवस साधना केली आहे. त्यामुळे अयोध्या हे जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र ठरले आहे. अशा अयोध्येत २२ जानेवारीला प्रभू श्रीरामललाची प्राणप्रतिष्ठापना होत आहे. त्या निमित्ताने संपूर्ण भारतभर त्याची सिद्धता चालू आहे. प्रचंड उत्साह जनतेमध्ये दिसून येत आहे. यानिमित्ताने हिंदू एकाच वर्षात दुसऱ्यांदा दिवाळी साजरी करत आहेत. गेली काही आठवडे सर्व देश आणि हिंदू भगवामय झाल्याचे दिसत आहेत. दूरचित्रवाहिन्या, सामाजिक माध्यमे, वर्तमानपत्रे, सामाजिक माध्यमे यांमध्ये केवळ प्रभु श्रीराम हाच विषय चालू आहे. त्यामुळे आपण भारताचे नागरिक म्हणून आपल्या प्रत्येक घरावरती ओम श्री रामचंद्रांचा भगवा ध्वज उभारून शौर्य त्याग बलिदान व विजयाची गुढी उभारावी प्रत्येकाने आपल्या घरासमोर सडा रांगोळी काढून तोरण उभरावे तसेच आपल्या घरामध्ये दीपोत्सव साजरा करावा परिवारातील प्रत्येक सदस्याला परिवारातील सर्व पशुना गोडपंचपकावान खायला द्यावे घरातील प्रत्येक सदस्यांनी श्रीरामचंद्राचा प्रतिमेचे पूजन करावे त्यांचा आदर्श घरातील प्रत्येक सदस्यांना लहान थोर मंडळींना सांगावा एक आदर्श व्यक्तिमत्व कसे असते लाखो वर्षानंतर सुद्धा इतिहास रचला जाऊ शकतो त्यासाठी आपले कर्म आपली निस्वार्थवृत्ती व आपलं चरित्र माणसांनी कसे जपावे याचे जगातील एकमेव उदाहरण म्हणजे प्रभू श्रीरामचंद्र आदर्श कुटुंबातील प्रत्येक सदस्यांना सांगावा.

# तुरीनेही दिल्या शेतकऱ्यांच्या हातावर तुरी; लागवड खर्चापेक्षा उतारा कमी

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**
**वाशिम :** यावर्षी सोयाबीन पाठोपाठ खरीपातील शेवटचे पीक असलेल्या तूरीनेही शेतकऱ्यांच्या " हातावर तुरी " दिल्या आहेत.तूर पिकाची कापणी करून काढणी अंतिम टप्प्यात आली आहे. एकरी एक,दोन, आणि क्वचित ठिकाणी तीन पोत्याचा उतारा लागत आहे. लागवड खर्चापेक्षा उतारा कमी लागत असल्यामूळे शेतकऱ्यांचे आर्थिक बजट कोलमडले असून बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. वर्षभराचे आर्थिक गणित सांभाळणाऱ्या खरिप हंगामातील सोयाबीन पिकाने यावर्षी शेतकऱ्यांना चांगलेच अडचणीत आणले आहे. हंगामाच्या सुरुवातीपासूनच संकटाची मालिका शेतकऱ्यांची पाठ सोडत नसल्याने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. उत्पादनात झालेल्या प्रचंड घटीमुळे लागवड खर्चासाठी काढलेले कर्ज



फेडायचे कसे ? हा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. उडीद, मूग, सोयाबीन आदी पिकांच्या उत्पादनात कमालीचा घट झालीच आहे,पण आता तुरीनेही शेतकऱ्यांच्या हातावर " तुरी " दिल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. सोयाबीन काढणी नंतरच्या काळात काही दिवस स्वच्छ वातावरणामुळे तुरीच्या पिकाने चांगलाच बहार धरला होता. त्यामुळे सहाजिकच थोड्याफार प्रमाणात का होईना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसु लागले होते.पण हे समाधान औटघटकेचे ठरले. नोव्हेंबरच्या अखेर ऐन फुलांच्या आणि शेंगाच्या मौसमातच अवकाळी पावसाने थैमान घातले होते. पाहता, पाहता काळया मातीत मोठ्या डौलाने डोलणारे तुरीचे पीक भुईसपाट झाले होते. अशाही परिस्थितीत शेतकऱ्यांनी महागडी कीटकनाशके, बुरशीनाशके फवारून अळ्यांचा बंदोबस्त करत तुरीचे पीक वाचवण्यासाठी खुप मेहनत घेतली होती. त्यामुळे जिल्ह्यातील बऱ्याच भागात पहिला बहर गळून पडलेल्या तुरीला नवीन फुलांचा बहर धरला होता. आणि त्याच आशेवर शेतकऱ्यांना तुरीच्या उताराची अपेक्षा होती. परंतू सध्यस्थितीत तुरीच्या पिकाची काढणी अंतिम टप्प्यात असून, एकरी उतारा एक, दोन, आणि क्वचित तीन पोत्याचा लागत असल्याची माहिती शेतकऱ्याकडून मिळाली आहे. परिणामी साडेसाती सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या हातावर आता तुरीनेही " तुरी " दिल्या असल्याचे अपरोधाने बोलल्या जात आहे.जून महिन्यातील मृग नक्षत्रात पेरल्या जाणारे तुरीचे पीक खरिप हंगामातील शेवटचे पीक असून, रब्बी हंगामाच्या मध्यंतरी सर्वात आधी शेतकऱ्यांच्या हातात येणारे नगदी पीक म्हणून तुरीच्या पिकाकडे पाहिले जाते. वाशिम जिल्ह्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर तूर पिकाचा पेरा आहे. यातील जवळपास ८० टक्के पिकला अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरणाचा फटका बसला आहे. त्याचा थेट परिणाम उत्पादनावर झाल्यामुळे उतारा कमी लागत आहे. सोयाबीन नंतर हातात पैसा देणारे पीक असल्यामूळे तुरीच्या पिकावर शेतकऱ्यांची खुप मोठी भिस्त असते परंतू लागवड खर्च वसूल होण्याईतपत देखील उत्पादन हातात येईना म्हणून शेतकऱ्यांची पंचाईत होत आहे.



"पेरणी, निंदन, कापणी हा झाला निव्वळ नगदी मजुरी भरण्याचा खर्च, त्यात खत,बी, आणि कीटक नाशक औषधे याची गोळाबेरीज केली तर एकरी १४ ते १५ हजार रुपये खर्च येतो . आणि उत्पन्न दोन पोते झालं आहे . अशा परिस्थितीत कर्जाची परतफेड कशी करावी ? आणि घरखर्च कसा भगवायचा ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत ..!
**विठ्ठल पंजाबराव खडसे , ( शेतकरी, शेलुखडसे ता .रिसोड )**

# अमोल साबळेंची विनंती अन् खा.सुप्रिया सुळेंची धावती भेट

## आमची चांगली घरं पाडली, आमची सोय करा : बेघरांचे गाऱ्हाणे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**
**लोणंद :** बेघर झालेल्या लोकांच्या समस्येवर इथल्या शासन व प्रशासनाचे लक्ष जावे म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते अमोल साबळे हे नेहमी आवाज उठवत असतात.
सर्व बेघरांना घेऊन आमदार संजय जगताप यांच्या समोर सुद्धा हा विषय अगदी पोट तिडकीने त्यांनी मांडलेला आहे.परंतु या प्रश्नी न्याय देण्याची भूमिका अजूनही प्रतीक्षेत आहेत.आज या बेघरांचं गाऱ्हाने खासदार सुप्रिया सुळे यांच्या समोरच मांडण्याची वेळ अमोल साबळे यांच्यावर आली.
बेघर झालेले डोंबारी,गारुडी,कातकरी,काडीवाले व वंचित घटकांची लोकं कशा पद्धतीने जीवन जगत आहेत.हे वास्तवच त्यांच्या समोर मांडले.त्यांच्या व्यथा ऐकून घेण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांची पाऊले बेघरांच्या दिशेने गेली.नियोजित दौऱ्यानुसार इथे भेट देण्याचा कार्यक्रम नसताना सुद्धा खासदार सुप्रिया सुळे यांनी अमोल साबळे यांच्यामुळे धावती भेट दिली.
खासदार सुप्रिया सुळे ह्या पुरंदर तालुक्याच्या दौऱ्यावर होत्या.निरा येथे त्या आल्या असता त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात घेण्यात आलेल्या चर्चासत्र कार्यक्रमातून संवाद साधला.यावेळी खासदारां समोर ग्रामस्थांनी आणि व्यापाऱ्यांनी निरेतील अनेक समस्या मांडण्याचा प्रयत्न केला.अमोल साबळे यांनी सुद्धा काही समस्या मांडल्या.यांपैकी बेघर झालेल्या विविध समाज घटकांतील व्यथा मांडणारी समस्या अत्यंत महत्वाची होती.या समस्येकडे खासदार सुप्रिया सुळे यांनी गांभीर्याने लक्ष देत चर्चा सत्र कार्यक्रमानंतर बेघर झालेल्या लोकांना त्या भेटण्यासाठी गेल्या.ग्रामपंचायत येथे चर्चासत्रा दरम्यान अमोल साबळे यांनी खा.सुप्रिया सुळे यांना त्या ठिकाणी भेट देण्याची जी विनंती केली होती. या विनंतीस खासदार सुप्रिया सुळे यांनी दाद दिली.



अन चर्चा सत्र कार्यक्रमानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनी अमोल साबळे यांना स्वतःच्या गाडीत बसण्यास सांगितले अन काही मिनिटांतच सर्वजण त्या ठिकाणी गेले.अमोल साबळेंनी केलेली विनंती आणि खा.सुप्रिया सुळे यांनी एखाद्या समस्येला जाणून घेण्याची दाखविलेली आत्मियता हे पाहून सर्वांनी या धावत्या भेटी बद्दल समाधान व्यक्त केले.त्या ठिकाणी लोकांच्या अडी अडचणी जाणून घेतल्या.शिवाय घरे पाडलेल्या जागेतच तात्पुरत्या स्वरूपात पत्राशेड टाकण्याची परवानगी देण्यात यावी.अशी विनंती रेल्वे प्रशासन डीएमआर यांना आपण करावी अशी सुचना सुद्धा खासदार सुप्रिया सुळे यांच्या कडे करण्यात आली. या संदर्भात रेल्वे प्रशासनातील वरिष्ठ यांच्याशी बोलेन असा विश्वास दिला.बेघर झालेल्या महिलांनी खा.सुप्रिया सुळे यांच्याशी संवाद साधताना म्हटले की,आम्ही ४० ते ५० वर्ष राहिलेलो आहे.आमची चांगली घरं पाडली. आमची सोय करा.यावेळी दत्ताआबा चव्हाण,राहुल काळे,पृथ्वीराज चव्हाण,
राहुल चव्हाण,सागर बागडे,साहिल बागवान,गणेश दरेकर,सुधाकर दरेकर,सागर काळे आदीं सह इतर उपस्थित होते.भेट दिल्याबद्दल सर्व महिलांनी तसेच अमोल साबळे यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना धन्यवाद दिले.ताई आपण आपल्या फ़ंडातून ह्यांना पत्रा शेड उभारून द्यावीत अशी सुद्धा विनंती अमोल साबळे यांनी केलेली आहे.

## 'सत्यशोधक' सर्वांनी जरूर बघावा; लेखिका मेघा टिळेकर यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

लोणंद : काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात सत्यशोधक हा चित्रपट



प्रदर्शित करण्यात आला.हा चित्रपट महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल चित्रित करण्यात आला.अनेक ठिकाणी हा चित्रपट अनेकांच्या माध्यमातून मोफत सुद्धा दाखविला जात आहे.चित्रपट पाहिल्यानंतर अनेक जण आपल्या प्रतिक्रिया सुद्धा देत आहेत.अंगावर शहारे येतील असे प्रसंग चित्रपटात पाहायला मिळाल्याने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्यानी किती अतोनात हालअपेष्टा सहन करून सामाजिक क्रांति घडवून आणण्याचे काम केले. याची जाणिव या चित्रपटातून होत आहे.फुले दांपत्याना समजून घेत असताना अनेक पुस्तक आपल्याला हाताळावी लागत असतात.आज चित्रपटाच्या माध्यमातून सुद्धा फुले दांपत्य यांचे कार्य पुढे येऊ लागले आहे.या चित्रपटाबद्दल अनेक राजकीय नेते मंडळी,सामाजिक कार्यकर्ते, फुले प्रेमीनी व साहित्यिक मंडळींनी सुद्धा हा चित्रपट पाहण्याचे आवाहन केलेले आहे.
स्मृतीस्थानांच्या अनुषंगाने (महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या समाजक्रांतीचे दर्शन) या पुस्तकाच्या लेखिका मेघा टिळेकर यांनी सुद्धा सत्यशोधक" सर्वांनी जरूर बघावा असे आवाहन केलेले आहे.लेखिका मेघा टिळेकर यांनी हा चित्रपट पाहिल्यानंतर त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.
चित्रपट,चित्रपटातील कलाकार यांचा अभिनय, लेखक व दिग्दर्शक यांच्याकडून करण्यात आलेली मांडणी,महात्मा फुलेंचे कार्य,सत्य मांडणी याबद्दल लेखिका मेघा टिळेकर यांनी विचार मांडलेले आहेत. टिळेकर म्हणतात की,महात्मा ज्योतिराव फुलेंसारख्या समाजक्रांतीचे प्रेरणास्थान असलेल्या उत्तुंग महापुरुषाचे संपूर्ण समाजकार्य एका अडीच तासांच्या चित्रपटामध्ये मांडणे ही एक अशक्य गोष्ट आहे.तरीदेखील जेवढे शक्य होतील तेवढे महात्मा फुलेंचे तेजस्वी कार्य, प्रभावी व्यक्तिमत्त्व, समाजाप्रती आणि समाजातील सुधरणांप्रती त्यांची असलेली तळमळ, आस्था, सत्याप्रती असलेली निष्ठा,त्यासाठीचा संघर्ष,त्या प्रत्येक संघर्षात सावित्रीबाईंची लाभलेली खंबीर साथ लेखक आणि दिग्दर्शक निलेश रावसाहेब जळमकर यांनी प्रभावीपणे मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. महात्मा फुलेंची भूमिका साकारणारे दिग्गज अभिनेते संदीप कुलकर्णी यांनीदेखील महात्मा फुलेंची कणखर भूमिका साकारण्यासाठी अतिशय मेहनत घेऊन तितक्याच ताकदीने साकारण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.तसेच सावित्रीबाईंची भूमिका साकारणाऱ्या राजश्री देशपांडे आणि चित्रपटातील इतर अनेक कलाकारांनी देखील आपल्या भूमिकेंना साजेसा उत्कृष्ट अभिनय केला आहे.त्यामुळे चित्रपट बघताना,आपल्या समोरच हे सगळे प्रसंग घडत आहेत आणि आता यावर महात्मा फुलेंची भूमिका काय असेल? याची उत्सुकता वाढत जाते.तेव्हांच्या परिस्थितीनुसार त्यांनी उचललेले प्रत्येक पाऊल, घेतलेले निर्णय आणि सत्त्याच्या बाजूने ठामपणे उभे राहण्याचे त्यांचे धाडस ह्या सगळ्याने प्रेक्षक खऱ्या अर्थानं भारावून जातो. काही प्रसंगात हृदय भरून येऊन डोळे पाणवतात.असे सुद्धा लेखिका मेघा टिळेकर यांनी म्हटलेले आहे.
पुढे त्या म्हणाल्या की,महात्मा फुलेंचे प्रखर महान कार्य समजून घेण्यासाठी त्यांच्यावरील व्यापक साहित्या बरोबरच या चित्रपटाची देखील मदत होईल. महात्मा फुलेंनी मुलींची पहिली शाळा काढली सर्वांनाच माहित आहे. परंतु त्या पलीकडेही अनेक जाचक रूढी परंपरांना तिलांजली देऊन त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या हे लक्षात येते.चित्रपट बघून झाल्यावरही त्यातील प्रसंग आणि संघर्ष आपल्या मनामध्ये घर करून राहतात आणि विचार करायला भाग पाडतात.
हा चित्रपट सर्वांनी जरूर बघावा असे मला वाटते.असे सुद्धा लेखिका मेघा टिळेकर यांनी म्हटलेले आहे.



## फुलंब्रीत मंदिर स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** भारतीय जनता पार्टी फुलंब्री शहर शाखेच्या वतीने मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या पुढाकाराने आयोजित या मंदिर स्वच्छता अभियानात आ. हरिभाऊ बागडे यांनी राम मंदिर पाण्याने धुऊन सहभाग नोंदवला. भारतीय जनता पार्टीचे अखिल भारतीय अध्यक्ष जीपी नड्डा यांनी सूचित केल्याप्रमाणे फुलंब्री विधानसभा क्षेत्रातीत धार्मिकस्थळांची स्वच्छता करावी, असे आवाहन हरिभाऊ बागडे यांनी केले होते. त्यांच्या " या संकल्प करूया..... स्वच्छ तीर्थ अभियानाचे भागीदार होऊया " अशी घोषणा त्यांनी केली होती. त्यास प्रतिसाद देत या स्वच्छता मोहीम अभियानात भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, माजी उपनगराध्यक्ष गजानन नागरे, भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, महिला भाजपा तालुकाध्यक्ष सविता नवले, रत्नाताई सोनवणे, विकास गायकवाड, वाल्मीक जाधव, अजय शेरकर, बाबासाहेब शिनगारे, गणेश राऊत, वाल्मीक जाधव, संतोष जाधव, चंद्रशेखर पालकर, सोमीनाथ दुतोंडे, मधुकर मुळे, चंद्रकांत राऊत, विकास शिरसाठ, सुदाम पवार, दत्ता संकपाळे, संजय नाईक यांच्यासह रामभक्तांनी या मोहिमेत सहभाग नोंदवला.

## नागपुरात मेट्रो भाड्यात ३० टक्के सवलत

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** नागपूर : २२ जानेवारी रोजी अयोध्या येथे राम मंदिराचे रीतसर उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. या निमित्ताने संपूर्ण देशात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
राम जन्मभूमीचा सोहळा राज्यभरात साजरा करण्यासाठी राज्य सरकाने २२ तारखेला शासकीय सुट्टी घोषित केली आहे. महामेट्रो यात मागे नाही. नागपूर मेट्रोतर्फे २२ जानेवारीला प्रवाशांकरिता तिकिटावर ३० % सुट जाहीर केली आहे. शासकीय रजेच्या दिवशी नागपूर मेट्रो तर्फे ३० % सुट नेहमीच दिली जाते. तोच लाभ या २२ तारखेला (सोमवारी) अयोध्या येथील सोहळ्याच्या निमित्ताने नागपूरकरांना मिळणार असून, यामुळे शहरात आयोजित कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याकरता नागरिकांना एका भागातून दुसऱ्या भागात प्रवास करणे अधिकच सोपे होणार आहे.
नागपूरकरांनी याचा फायदा घेत कार्यक्रमात सहभागी होण्याकरता नागपूर मेट्रोचा वापर करावा हे आवाहन नागपूर मेट्रो करीत आहे. मेट्रो सेवा ठरलेल्या वेळे प्रमाणे सकाळी ६ ते रात्रो १० पर्यंत नेहमीप्रमाणे उपलब्ध असेल.




# प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त मिठाई, कपडे वाटप

## सामाजिक कार्यकर्ते प्रा. बोराडे यांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजुर :** 22 जानेवारीला आयोध्यानगरीत प्रभू श्रीरामाचे आगमन होत आहे. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सर्वत्र मंदिर सफाई,कलश पूजन, शोभायात्रा, भजन संध्या यासारखे विविध धार्मिक कार्यक्रम होत आहेत. त्यामुळे संपूर्ण देशातील वातावरण राममय झाल्याचे दिसून येत आहे. श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सर्व समाज घटकांच्या सहभागातून हा कार्यक्रम सर्वव्यापी व्हावा या उद्देशातून राजूर येथील भटक्या समाजातील गरजू कुटुंबांना गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टर सुधाकरराव दानवे यांच्या हस्ते कपडे व मिठाईचे वाटप करण्यात आले.सामाजिक कार्यकर्ते प्रा. बाळासाहेब बोराडे यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला.

सर्वप्रथम भटक्या समाजातील नाथजोगी वस्तीवर जाऊन सफाई करण्यात आली.गव्हर्मेंट कॉन्ट्रॅक्टदार सुधाकरराव दानवे यांच्या हस्ते कुटुंबप्रमुखांचा भगवे रुमाल,टोपी देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते गरजू कुटुंबांना कपडे व मिठाईचे वाटप करण्यात आले.यावेळी सियावर रामचंद्र की जय अशा घोषणा देण्यात आल्या.

प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त पालावर येऊन मिठाई व कपडे वाटप केल्याबद्दल नाथजोगी परिवारातील सदस्यांनी समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास गव्हर्मेंट कॉन्टॅक्टर सुधाकरराव दानवे, भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ते भगवानराव नागवे ,पंडितराव पुंगळे,रामेश्वर सावंत, नारायण डकले,प्रा.बाळासाहेब बोराडे,आर.एच. दानवे,नंदकिशोर बनकर,मल्हारी पिंपळे,श्याम सावंत,एकनाथ शिंदे, जाधव साहेब प्रवीण देशमुख, शिवाजी पिंपळे, सोनवणे साहेब,विनोद शिंदे,देवगेश सोळंके, सचिन चव्हाण,आदीजन उपस्थित होते.



**प्रभू श्रीराम जनकल्याणकारी राजा :** प्रभू श्रीराम जनकल्याणकारी राजे होते . त्यांची रामराज्य संकल्पना विश्वव्यापी आहे .आजही सर्वसामान्यांच्या हृदयात राम सामावलेला आहे .राम प्रजाहितदक्ष,पशुपालक, कृषिपूजक होते . प्रभू रामांच्या स्वागतासाठी संपूर्ण देश राममय झाला आहे .या कार्यक्रमात सर्व समाज घटकांनी सहभागी व्हावे म्हणून भटक्या समाजाच्या वस्तीवर जाऊन गरजूंना कपडे व मिठाई वाटप करण्यात आली .याचे समाधान वाटत आहे . **प्रा . बाळासाहेब बोराडे, सामाजिक कार्यकर्ते, राजुर**

# एसबीआयचे एटीएम बँक कामकाज वेळा व्यतिरिक्त असते बंद

## ग्राहकांना इतर ठिकाणी द्यावे लागतात अतिरिक्त पैसे

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** जागतिक पर्यटन स्थळ असलेल्या लोणार शहरात भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया कडून होतंय ग्राहकांची गैरसोय शहरातील जुनी नॅशनल बँक असलेली भारतीय स्टेट बँक आवश्यक असलेली सोईसुविधा ग्राहकांना देत नाहीत. लोणार शाखेत तालुक्यातील शेतकरी, व्यवसायिक, पेन्शन धारक, सोबत सामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणात खाते असून या ठिकाणी नेहमी ग्राहकांची वर्दळ असते.

शहरात इतर नॅशनल बँक सुरू झाल्या तरीही मोठ्या प्रमाणात ग्राहक स्टेट बँक जुडलेले आहेत. पण बँकेकडून हवी तशी सुविधा ग्राहकांना दिली जात नाही. ग्राहकांजवळ बॅंकेचे एटीएम कार्ड असून एटीएम हे बँक शाखेसमोरच आहे.पण सुरक्षा कारणास्तव सुरक्षा रक्षक नसल्याकारणाने एटीएम कामकाजाच्या वेळेत सुरू असते.सकाळी ११ वाजेच्या पहिले किंवा ५ वाजेच्या नंतर जर ग्राहकांना पैसे काढायचे असल्यास नाईलाजाने इतर बँकेच्या एटीएम मधून पैसे काढावे लागते. यामध्ये ग्राहकांना केलेल्या प्रत्येक व्यवहारा प्रमाणे २५ रुपये चार्ज द्यावा लागतो.

एसबीआयच्या हजारो ग्राहकांच्या खिशाला चपराक बसत आहे. याकडे वरिष्ठाचे कोणतेच लक्ष नसल्याचे दिसून येते. लोणार स्टेट बँकेच्या एटीएम साठी सुरक्षा रक्षक नियुक्ती करुन एटीएम दररोज दिवस भर सुरू करण्यात यावे अशी मागणी भारतीय स्टेट बँकेच्या ग्राहकांकडून करण्यात येत आहे.तरी संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे तात्काळ लक्ष देऊन ग्राहकांची होणारी गैरसोय टाळावी अशी मागणी ग्राहकांकडून करण्यात येत आहे.




सुरक्षागार्ड नसल्याने सुरक्षा कारणास्तव एटीएम सुट्टीच्या दिवशीबॅंक कामकाज व्यतिरिक्त सुरू ठेवता येत नाही . वरिष्ठांकडे कळविले आहे गार्ड नियुक्ती होताच एटीएम दिवसभर सुरू होईल .
**विवेक इगवे, मॅनेजर, भारतीय स्टेट बँक लोणार**

लोणार भारतीय स्टेट बँकेचे एटीएम शोभेची वस्तू बनली आहे . अनेक वेळा एटीएम बंदच असतो किंवा फक्त बँकेच्या वेळेत सुरू असला तरी त्यामध्ये बहुतेक वेळ कॅश नसतो किंवा तांत्रिक बिघाड असतो .त्यामुळे ग्राहकांना नाइलाजास्तव खाजगी बँकेच्या एटीएम किंवा खाजगी काउंटर द्वारे अतिरिक्त पैसे मोजून विड्रॉल करावा लागतो . पर्यायाने ग्राहकांनी एसबीआयच्या एटीएम कडे पाठच फिरवल्याचे वस्तुनिष्ठ चित्र आहे . बँकेमार्फत आवश्यक कार्यवाही होऊन एटीएम सेवा सुरळीतपणे २४ तास सुरू असणे आवश्यक आहे .
**मो . असलम परवेज, एसबीआय ग्राहक लोणार**

# खडकी सदार ते शेगाव गजानन महाराज पायी दिंडी पालखी सोहळा प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** खडकी सदार येथील मारुतीच्या मंदिरामधून गजानन महाराज शेगाव पायी दिंडी 200 वारकऱ्यासह (दि.21) रविवार रोजी निघाली आहे. दिंडीचे सठावे वर्षे असून धोडप, गोभणी, भापूर, लेहणी, आरेगाव, डोणगाव, शेलगाव, कनका, अचंळआदी गावांतून वारकरी सहभागी झाले आहेत. दिंडीचे संस्थापक ह.भ.प काशिनाथ बाजड हे आहेत.

गेल्या कित्येक वर्षांपासून अविरत परंपरा असलेली खडकी सदार ते श्री क्षेत्र शेगाव पायदळ दिंडी आहे. या वर्षी दिंडीला पाच तप म्हणजे 60वर्ष पूर्ण होणार आहेत. वारकरी संप्रदायात पंच तप पूर्ती ला विशेष महत्व असते, दिंडीत खडकी सह परिसरातील अनेक गावातील वारकरी पुरुष महिला बाल गोपाळ सहभागी होत असतात. गेल्या अनेक वर्षापासून नामनिष्ठ ह भ प काशिनाथ महाराज बाजड यांच्या नेतृत्वात ही दिंडी शेगाव येथे श्री संत गजानन महाराज यांच्या दर्शनाला जात असते . विशेष म्हणजे दिंडीत ! नाम घेता वाटचाली ! यज्ञ पावलो पावली ! या संत वचणा प्रमाणे सकाळी काकडा, वाटचालीचे भजन , प्रवचन , सायंकाळी हरिपाठ व रात्री हरी कीर्तन या नियमा प्रमाणे दिंडी चालू असते.

दिंडीत रोज प्रवचन कीर्तन होत असतात, दिंडिसह अनेक नामवंत वारकरी असतात खडकी सदार च्या या दिंडीला भविंकाचा ही खूप मोठ्ठा प्रतिसाद असतो. दिंडीच्या वाटेने अनेक परमार्थ प्रेमी वारकऱ्यांची यथोचित सेवा करतात अशी ही अनेक वर्षांची परंपरा असलेली वारकरी दिंडी या वर्षी दि २१/०१/२०२४ ते ०१/०२/२०२४ असेल तरी जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन समस्त खडकी वासिया कडून करण्यात येत आहे. सध्या दिंडीची धुरा ह भ प नारायण महाराज बाजड यांच्या खांद्यावर आहे त्यांना गावातील वारकरी, गावकरी आणि परिसरातील गुणवंत वारकऱ्यांचे खूप सहकार्य असते. दिंडीत अनेक नामवंत वारकरी कीर्तनकार प्रवचनकार गायक वादक तसेच महिला भजनी मंडळी सुद्धा असतात. तसेच दिंडीत अनेक वाहन धारक विना मूल्य वाहन वारकऱ्यांच्या सोयी साठी घेतं असतात, वैद्यकिय सेवा सुधा सोबत असते. गावातील अनेक तरुण व जेस्थ मंडळी स्वंयसेवक म्हणून स्वयं स्फूर्ती ने वारकऱ्यांची सेवा करत असतात.




# अल्पवयीन बालिकेवर अत्याचार करून तिचा खून करणारे आरोपी पोलीसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** एका 6 वर्षीय बालिकेवर अत्यंत कुररतेने लैंगिक अत्याचार करून तिचा खून केला आणि नंतर तिचे प्रेत घरापासून 17 किलो मिटर दुर नेऊन टाकले. या नराधमाला पोक्सो न्यायालयाचे विशेष न्यायाधीश सी. व्ही. मराठे यांनी 12 दिवस पोलीस कोठडीत पाठविले आहे. दि. 14 जानेवारी रोजी मुदखेड तालुक्यातील एक 6 वर्षीय बालिका गायब झाली. तिचे प्रेत तिच्या घरापासून 17 किलो मिटर दूर 15 जानेवारी रोजी दिसले. बालिकेवर अत्यंत निर्दयीपणे लैंगिक अत्याचार केलेले होते. बालिकेच्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवरुन मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 2/2024 भारतीय दंड संहितेच्या कलम 363, 302, 366 (अ), 376, (अ)(ब), 201 सह बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा कलम 6 प्रमाणे दाखल झाला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपअधिक्षक सुशिलकुमार नायक यांच्याकडे देण्यात आला. या प्रकरणात पोलीसांनी 86 तासात दोन जण तपासासाठी ताब्यात घेतले होते.



त्यातील एकाला आज अटक करण्यात आली. पोलीस उपअधिक्षक सुशिलकुमार नायक, सहाय्यक पोलीस निरिक्षक चंद्रकांत पवार यांच्यासह अनेक पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदारांनी ताब्यात असलेल्या दोनपैकी दशरथ उर्फ धोंडीबा फुलाजी पांचाळ (23) रा. मुदखेड तालुक्यात यास न्यायालयात हजर केले. जिल्हा सरकारी अभियोक्त ॲड. रणजित देशमुख यांनी या प्रकरणी पोलीस कोठडीची मागणी करतांना सांगितले की, या प्रकरणातील बरीच तथ्य उघडकीस आणण्यासाठी पोलीस कोठडीची अत्यंत गरज आहे. त्यामध्ये या आरोपीने गुन्हा करतांना परिधान केलेले कपडे जप्त करायचे आहेत, खून कसा केला हे शोधून काढायचे आहे. युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायाधीश सी.व्ही.मराठे यांनी अल्पवयीन अत्यंत निरागस 6 वर्षीय बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या दशरथ उर्फ धोंडीबा फुलाजी पांचाळ (27) यास 12 दिवस अर्थात 31 जानेवारी पर्यंत पोलीस कोठडीत पाठविले आहे.या नराधमासाठी नांदेड येथील कोणत्याही वकिलांनी आपले वकीलपत्र दिलेले नाही.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्वतयारीचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024 च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून जिल्ह्यातील विधानसभानिहाय पूर्वतयारीचा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी शनिवारी आढावा घेतला. नियोजन सभागृह येथे आयोजित या बैठकीला जिल्हाधिका-यांसह मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., रंजित यादव, अतिरिक्त पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) दगडू कुंभार, सार्वजनकि बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, बल्लारपूरच्या उपविभागीय अधिकारी मानसी आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, सन 2014 व 2019 मध्ये चंद्रपूरची लोकसभा सार्वत्रिक निवडणूक पहिल्याच टप्प्यात झाली होती. ही शक्यता गृहीत धरून तसेच विदर्भात उन्हाळ्याची तिव्रता बघता आगामी 2024 ची लोकसभा निवडणूकसुध्दा पहिल्याच टप्प्यात राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे तयारीसाठी कमी कालावधी मिळणार असल्याने आतापासून पूर्वतयारी करून ठेवावी. संबंधित सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे नियोजित वेळेत कामे करणे अपेक्षित आहे. यात कोणतीही चूक होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

पुढे ते म्हणाले, आपल्याशी संबंधित प्रत्येक बाबींची इत्यंभूत माहिती संबंधित अधिकारी व नोडल अधिका-यांनी ठेवणे गरजेचे आहे. आपापल्या विधानसभा क्षेत्रात निवडणुकीचा ॲक्शन प्लान व सुक्ष्म नियोजन करा. स्थानिक पातळीवर निवडणुकीसंदर्भात घेतलेल्या विविध बैठकांचे इतिवृत्त व इतर नोंदी अपडेट ठेवा. प्रत्येक मतदारसंघात महिला कर्मचारी असलेले स्वतंत्र मतदान केंद्र, दिव्यांग कर्मचा-यांद्वारे चालविण्यात येणारे मतदान केंद्र, किमान 2 ते 3 आदर्श मतदान केंद्राची स्थापना करावी. सहायक निवडणूक अधिका-यांनी आपापल्या मतदारसंघातील अधिकारी व कर्मचा-यांचे प्रशिक्षण घ्यावे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करावे, आदी सुचना यावेळी जिल्हाधिकारी गौडा यांनी दिल्या.

सदर बैठकीत विधानसभा मतदारसंघनिहाय आढावा घेण्यात आला. यावेळी सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नोडल अधिकारी व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

जिल्ह्यातील मतदारांची संख्या : 5 जानेवारी 2024 च्या अंतिम यादीनुसार चंद्रपूर जिल्ह्यात 9 लक्ष 12 हजार 483 पुरुष मतदार, 8 लक्ष 69 हजार 788 स्त्री मतदार आणि 45 तृतीयपंथी मतदार असे एकूण 17 लक्ष 82 हजार 316 मतदार आहेत. जिल्ह्यायत एकूण दिव्यांग मतदारांची संख्या 6778 असून यात 4527 पुरुष दिव्यांग मतदार आणि 2251 स्त्री दिव्यांग मतदार आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात 2032 मतदान केंद्र आहेत.



# सत्यशोधकमधील सावित्रीबाई फुले प्रा.शाळेत अवतरतात तेव्हा...

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** धोंडवीरनगरच्या विद्यार्थ्यांनी शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने सत्यशोधक चित्रपट पाहिला आणि अवघ्या आठच दिवसात पडद्यावरील सावित्रीबाई फुले यांनी शाळेला भेट दिली हा विद्यार्थ्यांना आश्चर्याचा धक्काच होता.

सध्या महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत सत्यशोधक चित्रपट राज्यभरात प्रदर्शित झाला आहे. सत्यशोधक या चित्रपटातील बाल सावित्रीची भूमिका करणारी कलाकार समृद्धी रोहित सरवार हिने आपल्या पालकांसमवेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोंडवीर नगर येथे सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आठ दिवसांपूर्वी पडद्यावर पाहिलेल्या सावित्रीला बघून चिमुरडे अवाक झाले. प्रत्यक्ष बाल सावित्रीला भेटून शाळेतील चिमुकल्यांना खूपच आनंद झाला. समृद्धी व तिच्या वडिलांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मा.सरपंच शिवाजीराव सोनवणे, भाऊसाहेब पवार व ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षिका श्रीमती वसावे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



# अडचणींचा सामना करीतच ध्येयाप्रत पोहचता येते

## मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्र हे धम्मचळवळीत अग्रेसर ठरले आहे. माझ्या हस्ते या पवित्र पावन भूमीत धम्मदीक्षा संकल्प भवनाचा पायाभरणी केली आहे, याचा मला आनंद आणि गौरव वाटतो. याठिकाणी धम्मसंकल्प भवनाच्या माध्यमातून एक भव्य स्तूप तयार होत आहे. या स्तुपाच्या पायाभरणीपासून ते लोकार्पण सोहळ्यापर्यंत आपले सहकार्य असणे अपेक्षित आहे. कितीही अडचणी आल्या तरी त्यांचा सामना करीतच ध्येयाप्रत पोहचता येते असे प्रतिपादन येथील मनपा आयुक्त डॉ. महेशकुमारजी डोईफोडे यांनी केले. ते तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित धम्मसंकल्प भवनाच्या पायाभरणी समारंभात बोलत होते. ताम्रपत्रावर बुद्धवचन लिखित करून ते कलशामध्ये ठेवून श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या संकल्पित श्रामणेर दीक्षाभूमी इमारतीच्या मध्य भूगर्भात आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते सन्मान पुर्वक ठेवण्यात आले.

यावेळी अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो आणि भिक्खू संघ तसेच रिपब्लिकन हक्क परिषदेचे रमेशदादा सोनाळे, ज्येष्ठ आंबेडकरी नेते बापुराव गजभारे, रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष माधवदादा जमदाडे, नेते प्रभु सावंत, कॉ. गणेश शिंगे, बहुजन हक्क परिषदेचे सुखदेव चिखलीकर, उपप्राचार्य साहेबराव इंगोले, प्रा. एस.एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, विलास वाठोरे, प्रज्ञाधर ढवळे, टी. पी. वाघमारे, बी. एम. मल्हारे, एल. एन. खंडेलोटे, रोहिदास भगत, देविदास भिसे, इंजि. भरत कानिंदे, इंजि. भीमराव धनजकर, संदीप मांजरमकर, डॉ. राजू सोनाळे, अशोक गोडबोले, संभाजी कांबळे, सिद्धांत इंगोले, नागोराव नरवाडे, आप्पाराव नरवाडे, देवानंद नरवाडे आदींची उपस्थिती होती. ऋषिपठण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रात 'पौर्णिमोत्सव' या कार्यक्रमांतर्गत धम्मदीक्षा संकल्प भवनाचा पायाभरणी समारंभ आयोजित करण्यात आला होता. सकाळपासूनच परित्राणपाठ, त्रिरत्न वंदना, धम्मपालन गाथा, ध्यानसाधना, भोजनदान, बोधीपुजा, दान पारमिता, धम्मदेसना आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मनपा आयुक्त डॉ. महेशकुमारजी डोईफोडे यांच्या हस्ते प्रस्तावित धम्मसंकल्प भवनाची विधिवत पायाभरणी करण्यात आली. तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याचनेवरुन भिक्खू संघाने त्रिसरण पंचशील दिले. त्यानंतर मान्यवरांचा व दानदात्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. इंजि. भरत कानिंदे यांचा बौद्ध राष्ट्र थायलंड येथे श्रामणेर म्हणून जीवन व्यतीत केल्याबद्दल विशेष सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी भिख्खू संघाची धम्मदेसना संपन्न झाली.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने तथागत नगर व गोविंद नगर येथील उपासकांच्या वतीने भिख्खू संघास व उपस्थित बौद्ध उपासक उपासिका बालक बालिका यांना भोजनदान देण्यात आले. दरम्यान मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. यावेळी भदंत पंय्याबोधी थेरो यांनी प्रस्तावित धम्मसंकल्प भवनाची उभारणी समाजाच्या दानातूनच होईल त्यासाठी २०२९ ची प्रतिक्षा करावी लागेल असे सांगितले.

# नागपूर-नागभीड रेल्वे प्रकल्पाकडे सरकारचे दुर्लक्ष!

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : केंद्र सरकार एकीकडे घनदाट जंगलातील अदानींच्या कोळसा खाणीला लगेच परवानगी देण्याची तत्परता दाखवते. मात्र महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (महारेल)च्या नागपूर ते नागभीड रेल्वेमार्गाला गेल्या पाच महिन्यांपासून मंजुरी मिळत नसतानाही तिकडे लक्ष द्यायला सरकारला वेळ नाही. छत्तीसगडमध्ये हसदेव घनदाट जंगल आहे. तेथे वृक्षतोडीला स्थानिकांचा विरोध आहे. या जंगलात अदानी समूहाच्या परसा पूर्व आणि केते बसन टप्पा दोन या कोळसा खाणींच्या विस्तारला मंजुरी देण्यात आली असून वृक्षतोड देखील सुरू झाली आहे. दुसरीकडे तत्कालीन रेल्वे मंत्री नितीशकुमार यांनी नागपूर ते नागभीड नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज करण्यासाठी २००३-२००४ मध्ये सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले. पण, अद्याप हा रेल्वेमार्ग अस्तित्वात येऊ शकलेला नाही. सध्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (एनबीडब्ल्यूएल) या रेल्वे मार्गात अडसर ठरत आहे. वन्यप्राणी भ्रमणमार्गावर तीन ठिकाणी महारेल भुयारी मार्ग उभारणार आहे. त्यास भारतीय वन्यजीव संस्था, डेहराडून यांनी मान्यता दिली आहे. वन्यजीव उपशमन उपायोजनांसह सुधारित प्रस्ताव एनबीडब्ल्यूएलकडे ७ ऑक्टोबर २०२३ ला सादर करण्यात आला. रेल्वे मंत्रालय आणि राज्य सरकारचा हा संयुक्त प्रकल्प आहे. १०६.२ किलोमीटर नॅरोगेज रेल्वेमार्ग २४ नोव्हेंबर २०१९ ला वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. त्यानंतर २० महिन्यात ब्रॉडगेजचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. परंतु प्रारंभी करोनामुळे आणि आता वन्यजीव मंडळाच्या मंजुरीविना प्रकल्पाचे काम अडकले आहे.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118, राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142, 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर



जेजुरीच्या खंडोबा मंदिरावर श्रीराम अयोध्या प्राणप्रतिष्ठा दिन आणि खंडोबा देवाच्या सोमवारी होत असलेल्या विवाह सोहळ्यानिमित्त जेजुरीगडावर रविवारी विद्युत रोषणाई करत दीपोत्सव साजरा करण्यात आला.
छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# चिमुकल्यांनी रेखाटले बोरांवर श्रीराम

आधुनिक केसरी न्यूज

**कडेगाव :** रामायण प्रत्येकाच्या जीवनाचा विषय आहे, मग ते महाकाव्य असो, गदिमांच्या शब्दातून रंगणारा गीत रामायणाचा सुरेल संगीताचा अनुभव असो, की अगदी लॉकडाऊनचा असह्य काळ सुखकर करणारे रामानंद सागर यांचे रामायण.

मात्र या महाकाव्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये आपल्याला भेटणारी पात्र प्रत्येक स्वभावाची, प्रत्येक प्रवृत्तीची, कदाचित यामुळेच या पात्रांचं नेहमीच आपल्या मनात अढळ स्थान राहिले आहे रामायणातील तुमच आवडतं पात्र कोणत? असा प्रश्न विचारला तर लहानांपासून ते वयोवृद्धांपर्यंत या भल्या मोठ्या यादीत शबरी हा उल्लेख आल्यापासून राहणार नाही. प्रभू श्रीरामांची वर्षानुवर्षे वाट पाहणारी, थकलेल्या डोळ्यांनीही श्रीरामाच्या वाटेकडे आस लावलेली आणि प्रभू श्रीरामांच्या दर्शनानंतर आपण चाखलेली बोर खाऊन देवाला तृप्त करणारी ती शबरी. जिची उष्टी बोर खाऊनही प्रभू श्रीरामांनी तृप्तीचा ढेकर दिला अशी शबरीची कहाणी तिच्या बोराइतकीच गोड, आणि हृदयस्पर्शी आहे

दिनांक 22 जानेवारी रोजी कोट्यावधी भारतीयांचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्या प्रभू श्रीरामांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा सोहळा काही तासांवर येऊन ठेपला आहे. या धार्मिक व पवित्र वातावरणात भारती विद्यापीठ प्रशाला व ज्युनिअर कॉलेज नवी मुंबई शाळेतील उपक्रमशील कलाशिक्षक श्री नरेश लोहार यांच्या संकल्पनेतून 100 विद्यार्थ्यांनी प्रभू श्रीरामांची बोरांवर चित्रकलेच्या माध्यमातून अनोख्या प्रतिमा साकारलेल्या आहेत, तसेच काही विद्यार्थ्यांनी जय श्रीराम असे अक्षरलेखनही रेखाटले आहे. कलाशिक्षक श्री नरेश लोहार यांनी प्रभू श्रीराम आणि शबरी यांचे चित्र बोरांवर रेखाटले आहे. कलाशिक्षकआणि विद्यार्थी यांच्या या अनोख्या कलाकृतीतून श्रीरामाच्या भक्तीचा सुगंध परिसरामध्ये दरवळत असताना श्रीरामाचा जयघोष केला आहे .याही अगोदर दसऱ्याच्या मुहूर्तावर आपट्याच्या पानावर शंभर विद्यार्थ्यांनी प्रभू श्रीरामांचे चित्र रेखाटले होते. या दुसऱ्या अनोख्या उपक्रमाबद्दल भारती विद्यापीठ नवी मुंबई शैक्षणिक संकुलाचे संचालक डॉ. विलासराव कदम सर ,विद्यालयाचे प्राचार्य श्री बेल्लम आर. टी. उपप्राचार्य श्री. आर. एच. कदम सर यांनी कलाशिक्षक श्री नरेश लोहार व सर्व विद्यार्थी कलाकारांचे अभिनंदन केले



# श्रीरामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त पैठणमध्ये उत्साहाचे वातावरण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** अयोध्या येथे 22 जानेवारी रोजी श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात संपन्न होत आहे.याच पार्श्वभूमीवर पैठण शहरात संभाजीनगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्या नेतृत्वाखाली नियोजन करण्यात आले आसुन चेअरमन विलासबापु भुमरे यांनी कार्यक्रमाचे तसेच भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.शोभा यात्रे निमित्त पैठण शहर भगव्या वस्त्रांनी सजवण्यात आले आहे. शोभा यात्रा ही खंडोबा मंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी असेल त्यात उज्जैन येथील झांजपथक, व मावळ येथील प्रसिद्ध ढोल पथकासह हजारो वारकरी टाळ मृदंगाच्या गजरात शोभायात्रेत सहभागी होणार आसल्याची माहिती शिवराज पारिख यांनी दिली आहे. दि.22 रोजी शहरातील सर्वच मंदिरात विद्युत रोषणाई करण्यात येणार आसुन छत्रपती शिवाजी महाराज चौकात चेअरमन विलासबापु भुमरे यांच्या हस्ते सपत्नीक रामलल्लाच्या मुर्तीचा अभिषेक करण्यात येणार व महाआरती होणार असून प्रसाद वाटप होणार आहे.

तसेच पैठण शहर व्यापारी महासंघाच्या वतीने शोभायात्रेत सहभागी रामभक्तांना पाणी वाटप करण्यात येणार आहे.




# लोणार येथील पंचशील बुद्ध विहारात महिला उपासिका संघाची महत्त्वाची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन खंडारे**

**बुलढाणा :** धम्माला मानणारा संघ नसेल तर धम्म कसा बलवान होईल ? धम्म सोडून राहणारा मानूस गूलाम असतो.त्याला दूःख मूक्तीचा मार्ग मीळत नाही. जो धम्माच्या आचार सहितेचे पालन करतो तो मामूस दूःख मूक्त होतो. असे ऊदगार भीमशक्ती संघटनेचे राज्य सरचिटणीस भाई कैलास सुखधाने यांनी ऊपासिका संघाच्या सभेत अध्यक्ष पदावरून बोलतांना काढले. ते पंचशिल बूध्द विहार लोणार येथे आयोजीत ऊपासिका संघाच्या वतीने आयोजीत सभेत बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमूख अतीथी म्हणून सामाजीक प्रबोधनकार, लॉर्ड बूध्दा टी व्ही चॅनलचे प्रा. गजेंद्र गवई, भीमशक्तीचे किशोरदादा गवई, आंबेडकरी चळवळीचे झूंजार नेते भाई गूलाबराव सरदार, जेष्ठ नेते किसणराव मोरे, प्रा सुदन अंभोरे, अशोक अंभोरे, बंडू मोरे, कैलास अंभोरे, सूभाष अंभोरे,आंबादास सरदार, शाहीर संघपाल गवई, गजानन गवई, कॅमेरामन, नगरसेविका सौ जोत्साताई सरदार आ दि मान्यवर ऊपस्थीत होते. धम्म चळवळीचे प्रबोधनकार प्रा गजेंद्र गवई यांनी आपल्या भाषनात ऊपासिका संघाच्या स्थापनेचा ऊद्देश विषद करून आंबेडकरी चळवळीत व धम्म चळवळीत महीलांचे योगदान किती महत्वाचे आहे हे आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात सांगीतले. अनेक ऐतिहासीक दाखले देवून धम्म चळवळ लोणार येथे गतीमान करण्याचे आवाहन देखील त्यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला तथागत बूध्दांच्या व डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतीमांना फूलांच्या पूष्पमाला अर्पण करून त्रिसरण पंचशिलाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.यावेळी अनेक मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. पंचशिल बूध्द विहाराच्या ऊपासक, उपारिका यांनी यावेळी बिहार येथील बूध्दगया महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्या यासाठी प्रचंड घोषणा केली. हिन्दुची सर्व मंदिरे त्यांच्या ताब्यात आहेत. ईतरांची सर्व धार्मिक स्थळेआपआपल्या ताब्यात आहेत मग बूध्दांचे बुध्द विहार बौध्दांच्या ताब्यात का नाही असा रोकठोक सवाल येथे करण्यात आला. त्या मागणीची लॉर्ड बूध्दा टी व्ही चे प्रा गजेंद्र गवई यांनी तात्काळ दखल घेवून बौध्दांच्या या मागणी संदर्भात भावना जानून घेतल्या त्याचे चित्रीकरण केले.

कार्यक्रमाला शेकडो महिला ऊपासिका ऊपासकांची लक्षणिय ऊपस्थीती होती. कार्यक्रमाचे संचालन प्रा सुदन अंभोरे सर यांनी केले तर आभार भाई गूलाबराव सरदार यांनी मानले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in